J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar
9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar
9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५७ ■ शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# तेल बाजारात मंदी; पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात !

## भारतात इंधन दरवाढ होणार नाही- केंद्र


दक्षता नगर पेट्रोल पंप, अकोला

वृत्तसंस्था २७ मार्च

**नवी दिल्ली :** तेल आणि गॅस पुरवठ्यातील व्यत्ययात एलपीजी सिलिंडरनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढ होण्याची भीती असताना केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रातील मोदी सरकारने वाढत्या जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींना तोंड देण्यासाठी व तेल कंपन्यांना मदत करण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी केले आहे. इंधनाच्या वाढत्या किमती आणि राज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संभाव्य सार्वजनिक चिंतेच्या पार्श्वभूमीवर पाऊल उचलले आहे.

गुरुवारी सकाळ सकाळी सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, सरकारने पेट्रोलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क कमी करून ३ रुपये प्रति लिटर केले, तर डिझेलवरील शुल्क पूर्णपणे रद्द केले आहे परिणामी, या दोन्ही इंधनांवरील करांमध्ये १० रुपयांची कपात झाली आहे. हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे, जेव्हा जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढत आहेत आणि देशांतर्गत इंधन बाजार स्पष्टपणे तणावाखाली आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे भारताच्या क्रूड बास्केट म्हणेज कच्च्या तेलाच्या सरासरी किमतीचे दर १४९ डॉलर्स प्रति बॅरलवर रेंगाळत असून इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष सुरू झाल्यापासून गेल्या काही आठवड्यांत जागतिक तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे; यामुळे तेल विपणन कंपन्यांचा उत्पादन खर्चही वाढला आहे. अशा परिस्थितीत, किरकोळ दर कमी करण्याऐवजी टॅक्समधील कपात या कंपन्यांना वाढत्या खर्चापासून दिलासा देण्यासाठीच असावी असे वाटते. थोडक्यात बोलायचे तर सध्याचे दर खाली आणण्यापेक्षा पुढील किंमतवाढ रोखण्यास अधिक मदत होण्याची शक्यता आहे. त्याचवेळी, सरकारकडे नुकत्याच केलेल्या शुल्क सुधारणेच्या अवघ्या एक दिवस आधीच, खाजगी इंधन विक्रेत्या नायरा एनर्जीने पेट्रोलचे दर प्रति लिटर ५ रुपये आणि डिझेलचे दर ३ रुपयांनी का वाढवले, सरकारच्या या पावलांवरून स्पष्ट दिसून येते आणि किमतींवर दबाव आताच वाढू लागल्याचे संकेत आहेत.

### सध्याचे दर कायम ठेवण्यासाठी वाव!

सरकारने केलेली पेट्रोल-डिझेलमधील उत्पादन शुल्क कपात कागदावर ग्राहकप्रेमी वाटत असली तरी, खरा उद्देश वेगळाच दाखवते. तेल कंपन्या म्हणजे ओएमसीएस अनेक आठवड्यांपासून कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती सहन करत आहेत. अशा स्थितीत, काही प्रमाणात दिलासा मिळाल्याशिवाय किरकोळ इंधन दरात मोठी वाढ करण्याशिवाय त्यांच्याकडे फारसा पर्याय उरणार नाही. अशाप्रकारे, उत्पादन शुल्क कमी करून सरकार या कंपन्यांना दर वाढवण्याऐवजी सध्याचे दर कायम ठेवण्यासाठी वाव देत आहे.

### कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम

पश्चिम आशियामध्ये अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आणि त्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या होत्या. मात्र, इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले १० दिवसांसाठी थांबवण्याच्या अमेरिकेच्या घोषणेनंतर, शुक्रवारी सकाळच्या सत्रात किमती किंचित घसरल्या. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, ब्रेंट क्रूड ०.८.८ टक्केने घसरून प्रति बॅरल १०७.११ १ डॉलरवर आले, तर यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) ०.८८ टक्केने घसरून प्रति बॅरल ९३.६५ डॉलरवर आले. आदल्या दिवशी या दोन्ही तेलांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली होती.

## लॉकडाउन नाही

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संकटामुळे देशात देशव्यापी लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, असे केंद्र सरकारने शुक्रवारी स्पष्ट केले. सरकारचे तीन वरिष्ठ मंत्री निर्मला सीतारामन, किरण रिजिजू आणि हरदीप पुरी यांनी निवेदने जारी करून या केवळ अफवा असल्याचे स्पष्ट केले. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे रिजिजू यांनी नमूद केले आणि खुद्द पंतप्रधान मोदी स्वतः या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनीही जनतेला घाबराट निर्माण न करण्याचे आवाहन केले आणि लॉकडाऊन लागू करण्याचा सरकारचा कोणताही इरादा नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. वास्तविक पाहता, चार दिवसांपूर्वी संसदेत पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या एका विधानानंतर लॉकडाऊनबाबतच्या अफवा पसरण्यास सुरुवात झाली होती.

# पुण्यात सक्तीच्या रजेवर अकोल्यात काय?

प्रतिनिधी २७ मार्च

**पुणे / अकोला :** पुणे जिल्ह्यातील जमीन महसूल अभिलेखांमध्ये मोठ्या गैरव्यवहाराचा पर्दाफाश झाला असून, राज्य शासनाने याप्रकरणी कठोर पावले उचलली आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीचा वर्ग, क्षेत्रफळ आणि भोगवटदारांमध्ये बेकायदेशीर बदल केल्याच्या गंभीर तक्रारीनंतर सखोल चौकशी करण्यात आली. या चौकशीसाठी नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नेमण्यात आली होती. समितीने तपासलेल्या २,२२७ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे अतिगंभीर असल्याचे समोर आले. या प्रकरणांमध्ये जाणीवपूर्वक कायद्याचा गैरवापर करून मालकी हक्कांमध्ये फेरफार करण्यात आल्याचे समितीने स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणाची दखल राज्य विधानपरिषदेत घेण्यात आली होती. लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान महसूल मंत्र्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाईचे आश्वासन दिले होते. त्यानुसार शासनाने या १३ गंभीर प्रकरणांतील जबाबदार अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

### कारणे दाखवा नोटीस नंतर काय

पुणे येथील जमाबंदी आयुक्तांनी अकोल्यातील भूमि अभिलेख विभागातील दहा अधिकारी व कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी महिन्यात कारणे दाखवा नोटीस बजावली होती. निलंबित तत्कालिन उपअधीक्षक पंकज पवार यांच्या कार्यकाळात अकोल्यात मालमत्ता पत्रक, मोजणी आणि वारसा नोंदीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. प्रॉपर्टी कार्डमध्ये नियमबाह्य फेरफार झाल्याचा संशय असून, यामध्ये मोठे आर्थिक हितसंबंध गुंतल्याची चर्चा होती. पुणे येथील जमाबंदी आयुक्तांच्या निर्देशानुसार ज्या १० जणांना नोटिसा देण्यात आल्या आहेत, त्यामध्ये तत्कालीन शिरस्तेदार, भूमापन विभागाचे कर्मचारी आणि लेखा विभागातील व्यक्तींचा समावेश आहे. भूमि अभिलेख विभागाच्या अमरावती विभागाचे उपसंचालक यांनी या विषयीचा आदेश काढला असून यात तत्कालिन उप अधीक्षक भूमि अभिलेख पंकज पवार, सागर मांडवगडे, राजेश काळे, नितीन पारधी, सचिन कोलते, राजेश शेगोकार, गजेंद्र चव्हाण, विवेक भरक्षे, कुणाल राजपुत, प्रमोट रंगारे यांच्या नावाने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

## प्रभू श्रीरामांच्या जयघोषाने दुमदुमली राजराजेश्वर नगरी !



गुरुवारी चैत्र शुद्ध नवमीच्या शुभ पर्वावर अकोल्याचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिर येथून श्रीराम जन्मोत्सवाच्या भव्य शोभायात्रेचा प्रारंभ झाला. या मंगलमय प्रसंगी उपस्थित राहून अकोल्याचे श्रद्धास्थान असलेल्या 'मोठे श्रीराम मंदिर' येथे प्रभू रामचंद्रांचे विधिवत पूजन आणि दर्शन पालकमंत्री आ. आकाश फुंडकर यांनी घेतले. यावेळी त्यांनी ढोल ताशांच्या ठेक्यावर ताल धरत रामभक्तांसोबत उत्साहाने सहभाग नोंदविला. या सोहळयात आमदार रणधीर सावरकर, आमदार हरिश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल आणि महापौर शारदाताई खेडकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. गुरुवारच्या शोभायात्रेतील विविध संघटनांतर्फे सादर केलेले रामायणातील प्रसंग, भजनी मंडळांचा सूर आणि ढोल-ताशांच्या गजराने संपूर्ण शहर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले होते.

# अशोक खरातच्या जाळ्यात अनेक बडे मासे !

प्रतिनिधी २७ मार्च

**नाशिक :** अघोरी पूजा आणि महिलांच्या शोषणाने महाराष्ट्र हादरवून सोडणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणाची व्याप्ती आता अधिकच वाढत चालली आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या 'एसआयटी'ने जाहीर केलेल्या हेल्पलाईनवर अवघ्या काही दिवसांत तक्रारींचा पाऊस पडला असून, खरातने केवळ महिलांचे शोषणच केले नाही, तर राजकीय नेते आणि सेलिब्रिटींनाही कोट्यवधी रुपयांनी लुटल्याची माहिती सूत्रांच्या माध्यमातून समोर आली आहे.

एसआयटीने खरात विरोधात माहिती देण्यासाठी दोन हेल्पलाईन क्रमांक जाहीर केले होते. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १०० हून अधिक फोन कॉल्स या क्रमांकावर आले आहेत. यात प्रामुख्याने नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर (अहमदनगर) भागातील नागरिकांचा समावेश आहे. अनेक महिलांनी फोन करून खरातने केलेल्या अत्याचाराची आणि फसवणुकीची माहिती पोलिसांना दिली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, खरातच्या जाळ्यात केवळ सामान्य नागरिकच नाहीत, तर नाशिक आणि आसपासच्या जिल्ह्यातील अनेक बडे राजकीय नेते आणि सेलिब्रिटी अडकल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. राजकीय प्रगती आणि भविष्यातील संकटे टाळण्यासाठी अनेक नेते खरातकडे जात असत. भविष्याच्या नावाखाली खरातने या बड्या व्यक्तींकडूनही मोठी रक्कम उकळली आहे.

### खरातच्या ओकस कार्यालयावर एसआयटीची कारवाई

भोंदूबाबा अशोक खरात याच्या ओकस कार्यालयावर एसआयटीने मोठी कारवाई केली आहे. पंचांच्या समक्ष कार्यालयाला सील करत टाळं ठोकण्यात आलं आहे. एसआयटी आणि फॉरेन्सिक टीमने कार्यालयाची सखोल पाहणी केली असून तपासाला वेग दिला आहे. दरम्यान, फॉरेन्सिक टीमने कार्यालयातून प्रिंटर आणि महत्त्वाची कागदपत्रं ताब्यात घेतली आहेत.

### अशी होती खरातची मोडस ऑपरेंडी!

अशोक खरातची नवीन मोडस ऑपरेंडी समोर आली आहे. ग्राहकाची माहिती गोळा करण्यासाठी अशोक खरात स्वतंत्र यंत्रणा राबवत होता. त्याच्याकडे येणाऱ्या भोळ्या भाबड्या ग्राहकांची आधीच माहिती मिळवत होता, असा पोलिसांना संशय आहे. यासाठी तो कोल्ड रिडिंग व हॉट रिडिंग तंत्रांचा वापर करत होता. हॉट रिडिंगमध्ये आधीच माहिती गोळा करून ठेवली जाते. तर कोल्ड रिडिंगमध्ये पहिले काही प्रश्न विचारून त्यावरून अंदाज लावत समोरच्याला भ्रमित केलं जातं. मानसशास्त्र आणि फेस रीडिंगचा प्रभावी उपयोग करत होता.

# भारतीय रुपयाची पहिल्यांदाच ९४ वर ऐतिहासिक घसरण!

वृत्तसंस्था २७ मार्च

**नवी दिल्ली :** शेअर बाजार आणि जागतिक बाजारातील गोंधळाच्या पार्श्वभूमीवर २७ मार्च रोजी भारतीय रुपयामध्ये मोठी घसरण झाली. शुक्रवार, आठवड्याच्या शेवटच्या व्यापार दिवशी, भारतीय रुपया आणखी रसातळाला पोहोचला आहे. तब्बल एक महिन्याआधी इराण आणि अमेरिका-इस्रायलमध्ये युद्धाचा शंखनाद झाल्यापासून रुपयात सुमारे ३.५ टक्के घट झाली आहे. रुपया प्रथमच ९४ डॉलरचा टप्पा ओलांडून ९४.१५ या सर्वकालीन नीचांकी पातळीवर आला. मध्यपूर्वेतील युद्ध आणि ऊर्जा संकटाच्या भीतीमुळे भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांच्या चलनावर दबाव वाढला आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या ऊर्जा संकटाच्या धोक्यामुळे तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलवर राहिल्या आहेत, ज्यामुळे जागतिक शेअर बाजारावर दबाव वाढला असून बॉण्डवरील यील्ड वाढले.

पश्चिम आशियात युद्ध आणि इराणच्या संकटामुळे भारतीय रुपया कमजोर झाला असून युद्ध असेच चालू राहिले, तर तेलाचा पुरवठा अधिक महाग होण्याची गुंतवणूकदारांना भीती आहे. भारत आपल्या गरजेच्या बहुतांश कच्च्या तेलाची आयात करतो आणि डॉलर महागल्यास रुपयाचे मूल्य घसरते. विश्लेषकांनी भारताच्या विकासाचे अंदाज कमी केले आणिया संकटाच्या परिणामामुळे महागाई वाढेल, ज्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँकेला पुढील १२ महिन्यांत व्याजदर वाढवावे लागतील असे काहींचे मत आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर, अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
> इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
> इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
> शालेय पोषण आहार
वैशिष्ट्ये :
> अनुभवी शिक्षकवृंद
> सुसज्ज पायाभूत ईमारत
> दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
> सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
> आनंददायी शिक्षण पध्दती
> CCTV ची सुविधा
> कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
> सुसज्ज प्रयोगशाळा
पत्ता : मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

# गॅस पाठोपाठ आता पेट्रोलपंपांवरही उसळली गर्दी


रांगाच रांगा चोहीकडे....

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला :** दोन दिवसांपासून जिल्ह्यासह शहरात पेट्रोल टंचाईचा भडका उडालेला आहे. गॅस सिलिंडरनंतर आता पेट्रोल टंचाईची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाल्यामुळे प्रत्येक पेट्रोलपंपांवर सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत वाहनधारकांच्या रांगा दिसत आहेत.

मध्यपूर्वेतील युद्धाचे दृश्य परिणाम हळूहळू सर्वच क्षेत्रावर होत आहे. गॅस टंचाईनंतर आता पेट्रोलची टंचाई निर्माण होण्याची अफवा नागरिकांमध्ये पसरल्यामुळे प्रत्येक जण पेट्रोलपंपाकडे धाव घेत आहे. जो नेहमी १०० ते २०० रूपयांचे पेट्रोल टाकीत असे तो टाकी फूल करीत असल्याचे चित्र गुरूवारी रात्री उशिरापर्यंत आणि शुक्रवारी सकाळपासून दिसून येत आहे. शहरातील हे चित्र सर्वच पेट्रोलपंपांवर दिसून आले असून, जिल्ह्यातील तालुक्यांसह मुख्य रस्त्यावरील अनेक पेट्रोलपंप गुरूवारी बंद असल्यामुळे नागरिकांना वणवण भटकंती करावी लागली आहे. एवढी भीषण परिस्थिती जिल्ह्यात निर्माण झाली आहे. गॅस सिलिंडरनंतर आता पेट्रोलचा नंबर लागतो की काय, या विचाराने नागरिक सैरभैर झाले असून, ते पेट्रोलपंपांवर तुफान गर्दी करीत आहेत. आतापर्यंत सुरळीत असलेला पेट्रोल, डिझेलचा पुरवठा दोन दिवसांपासून प्रभावित झाल्याचे दिसून येत आहे. सध्याची परिस्थिती पाहता नागरिक अधिकच पॅनिक होत आहेत. त्यामुळे पेट्रोलपंपांवर रांगा लागल्या पाहून येणारे-जाणारे नागरिकही सुरक्षेचा उपाय म्हणून गरज नसतानाही पेट्रोल भरीत असल्याने ह्या रांगा वाढतच असल्याचे चित्र दिसून आले.

### सणासुदीच्या काळातही सिलिंडरसाठी रांगा

मार्च आणि एप्रिल महिन्यात सर्वाधिक सण उत्सव येत असतानाच सर्वसामान्य नागरिक गॅस सिलिंडर मिळण्यासाठी सकाळपासूनच रांगेत उभे असलेले दिसून आले. बुकींग केल्यानंतरही सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी ऑनलाइन बुकींग होत नसल्याने त्यांना प्रत्यक्ष एजन्सीवर जाऊन बुकिंग करावे लागत आहेत. त्या ठिकाणी सकाळपासूनच रांगा लागत आहेत. त्यामुळे नागरिकांना कामधंदे सोडून तासनतास ताटकळत राहावे लागत असल्याचे दिसून येते.

### गो-गॅसवर ऑटोधारकांच्या रांगा

शहरात प्रदूषण कमी करण्यासाठी अनेक ऑटो गॅसवर चालविण्यात येत आहेत. शहरातील एकमेव गॅस पंप असलेल्या पोस्ट ऑफिस पंपावर गॅससाठी ऑटोधारकांच्या नेहमीच रांगा लागलेल्या असतात. त्यातच या गॅसच्या किमती स्थिर नसल्याने त्या नेहमीच वाढत असल्याचे ऑटोधारकांचे म्हणणे आहे. एकप्रकारे हा नागरिकांच्या अडचणीचा फायदा उचलण्याचा प्रकार असल्याची संतापजनक प्रतिक्रिया ऑटोधारकांमधून व्यक्त होत आहे.

Samartha Shikshan Prasarak Mandal Reg. No.F.5226 Dwara Sanchalit
Sunshine Kids PRE PRIMARY SCHOOL
PROSPECTUS
A Bright Beginning for Little Learners !
Play & Learn
Creative Activities
Caring Teachers
Fun & Games
Our Programs
+Playgroup
+ Nursery
+ Jr.KG
+ Sr.KG
Why Choose Us ?
> Safe & Nurturing Environment
> Activity-Based Learning
> Personalized Attention
> Indoor & Outdoor Play Areas
ADMISSION OPEN
Visit us: Maa Gayatri School, Gayatri Nagar, Kaulkhed Road, Akola
8329639213 Visit time 8:00am to 11:30

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## सावंगा आसरा येथे नवीन रास्त भाव दुकान मंजुरीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध

**अमरावती :** तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रातील सावंगा आसरा येथे नवीन रास्त भाव दुकान मंजुरीसाठी प्रशासकीय स्तरावर प्रक्रिया सुरू झाली असून, त्यासाठीचा अधिकृत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार, या दुकानाचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाद्वारे करणे आवश्यक राहणार आहे. या प्रक्रियेत वैयक्तिक अर्जांचा विचार केला जाणार नसून, केवळ नोंदणीकृत संस्था आणि बचत गटांनाच संधी मिळणार आहे. या जाहीरनाम्यानुसार, ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयं सहाय्यता बचत गट, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमअंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था आणि सार्वजनिक संस्था किंवा ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र अर्जांची निवड करताना बचतगटांच्या बाबतीत त्यांचे आर्थिक व्यवहार, पारदर्शकता आणि किमान ८० टक्के कर्ज परतफेडीचे प्रमाण विचारात घेतले जाईल.

## जादूटोणा विरोधी कायदा प्रचार प्रसार समिती रद्द करण्याचा सरकारचा घाट

### त्या विरोधात विवेकवादी, प्रागतिक संघटना कार्यकर्ते यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी २७मार्च

**अमरावती :** महाराष्ट्रात बुवाबाजी शोषण, कर्मकांड, अत्याचार, अंधश्रद्धा यांनी धुमाकूळ घातलेला होता. हे सर्व आटोक्यात आणण्यासाठी सन २०१३ पासून राज्यात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याच्या प्रसार प्रचारासाठी शासकीय समिती देखील गठीत केलेली आहे. मात्र राज्यातल्या धर्मांध संघटना आणि सत्ताधारी पक्ष यांनी एकत्रित येऊन जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रसार प्रचारासाठी बनवलेली ही शासकीय समितीच रद्द करण्याचा घाट घालत आहेत. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या



पुढाकाराने कायद्याला विरोध करणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधीची बैठक सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ आणि अधिकाऱ्यांसोबत मंगळवारी (दि.२४) मुंबईत मंत्रालयात होणार होती. मात्र नाशिक येथील बुवाबाजी करणारा कॅप्टन अशोक खरात प्रकरणाची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे. त्यानुषंगाने जादूटोणा विरोधी कायद्याची आणि अंधश्रद्धा निर्मूलन कामाची गरज पुन्हा अधोरेखित होत आहे. त्यामुळे अशी बैठक घेऊन समिती रद्द करण्याचा निर्णय अंगाशी येईल असे वाटल्याने सामाजिक न्याय विभागाने बैठकच रद्द केल्याचे समजते. ही बैठक सध्या तात्पुरती रद्द केली असली तरी पुन्हा काही दिवसातच बैठक घेऊन समिती रद्द करण्याचा डाव आखला जाईल. त्यामुळे या समिती रद्द करण्याच्या निर्णयाला सर्व परिवर्तनवादी संघटना, चळवळींचा विरोध आहे. समिती रद्द करून कायदा अंमलबजावणीला मोठा अडसर निर्णय होईल. त्यामुळे राज्यात अजून अंधश्रद्धा, कर्मकांड वाढीस लागेल. महाराष्ट्राच्या विधीमंडळात जवळपास दोन दशके जादूटोणा विरोधी कायद्याची मागणी करण्यापासून ते, तो कायदा मंजूर करून घेण्यासाठी आम्ही विविधांगी लक्षवेधी आंदोलने केली आहेत. दरम्यानच्या काळात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची कायद्याला विरोध असणाऱ्या शक्तींकडून हत्या करण्यात आली.

## संकट मोचन विजय हनुमान मंदिर प्रवेशद्वाराचे उद्घाटन

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती:** आज रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त बडनेरा रोड येथील दसरा मैदान परिसरातील श्री संकट मोचन विजय हनुमान मंदिराच्या नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य प्रवेशद्वाराचे उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हा प्रवेशद्वार आ.रवि राणा यांच्या विकास निधीतून साकारण्यात आला असून उद्घाटन युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनील राणा यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपमहापौर सचिन भेंडे, भ्एझ् गटनेते नाना आमले, नगरसेवक मिलिंद बांबल तसेच मंदिराचे अध्यक्ष महंत मदनमोहनदास महात्यागी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी



मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून भगवान श्रीराम व हनुमानजींच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला.

आज रामनवमीसारख्या पवित्र दिवशी श्री संकट मोचन विजय हनुमान मंदिराच्या प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्याचा मान मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब आहे. आ. रवि राणा यांच्या विकास निधीतून साकारलेले हे प्रवेशद्वार केवळ एक बांधकाम नसून, भक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे.

सुनिल राणा.यांनी सांगीतले की, मंदिर हे आपल्या संस्कृतीचे व आध्यात्मिक उर्जेचे केंद्र असते. या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला शांतता, सकारात्मकता व प्रेरणा मिळते. या प्रवेशद्वारामुळे मंदिराची शोभा वाढली असून भाविकांना अधिक सुसज्ज सुविधा मिळतील, याचा मला आनंद आहे.

यापुढेही आपण सर्वांच्या सहकार्याने अशा विकासकामांना गती देत राहू व समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध राहू. सर्व नागरिकांना रामनवमीच्या हार्दिक शुभेच्छा!ङ्ग नवीन प्रवेशद्वारामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडली असून भाविकांना अधिक सोयीस्कर व सुशोभित प्रवेश उपलब्ध झाला आहे. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून रामनवमीच्या शुभेच्छा देत मंदिराच्या विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच भविष्यातही परिसराच्या विकासासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे आश्वासन देण्यात आले.

यावेळी दीपकभाऊ नवाथे, रमेशभाऊ देशमुख, पवनभाऊ नवाथे, डॉ. काळबांडे सर, प्रेम जोधे, निशादित जोधे कर्ण घोटे, मनोज मिटकरी, शंकरराव राजनाणी, किशोर ढोले, गणेश तिडके, स्वस्तिक ठोसर, वैभव इरफळ व सर्व सुंदरकांड मंडळी व भक्तगण उपस्थित होते.

## ४३ विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटची संधी; विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची घवघवीत कामगिरी

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती :** स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्हमध्ये तब्बल ४३ विद्यार्थ्यांची निवड होऊन संस्थेने प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे संस्थेच्या गुणवत्ता आधारित शिक्षणपद्धतीला आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मोठी दाद मिळत आहे.

मधील माहितीनुसार, ुिंत प्‌-ऊाम्प्‌ एदेर्ज्ड्रंगदह ध्र्‌., छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक २४ मार्च २०२६ रोजी ही भरती प्रक्रिया पार पडली. विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीच्या अंतर्गत येणाऱ्या आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयांतील



विद्यार्थ्यांसाठी विविध पदांसाठी ही विशेष भरती मोहीम आयोजित करण्यात आली होती.

ही संपूर्ण भरती प्रक्रिया विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे येथे पार पडली. विद्यार्थ्यांची नोंदणी, लेखी परीक्षा, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखती अशा विविध टप्प्यांतून निवड प्रक्रिया राबविण्यात आली. मोठ्या संख्येने आर डी आय के महाविद्यालय, बडनेरा, राजाभाऊ देहमुख महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर, महिला आर्टस् आणि कॉमर्स महाविद्यालय, चांदुर रेल्वे, इंदिरा बाई मेघे महाविद्यालय, अमरावती आणि समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा च्या विद्यार्थ्यांनी या ड्राइव्हमध्ये सहभाग नोंदविला होता. अंतिम टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करत ४३ विद्यार्थ्यांनी नोकरीची संधी मिळवली, ज्यामुळे संस्थेच्या प्लेसमेंट रेकॉर्डमध्ये आणखी भर पडली आहे. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामीण आणि अर्धनगरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच करिअरच्या भक्कम संधी मिळत असून, या यशामुळे संस्थेची ओळख प्लेसमेंटच्या बाबतीत अधिक मजबूत झाली आहे.

## इलेक्ट्रीक वायर चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

### १५ हजार ५०० चा मुद्देमाल जप्त; तीन गुन्हे आणले उघडकीस

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती :** २६-०३-२०२५ रोजी गुन्हे शाखा चे पथक पोलीस ठाणे खोलापुरी गेट अमरावती शहर येथे दाखल अपराध क्रमांक ७८/२०२६ कलम ३०५ BNS चा समांतर तपास करीत असता गुप्त बातमीदारा कडुन माहीती प्रास झाली की, गुलजार नगर येथील मस्जीद समोर राहणारा शेख अझरुद्दीन शेख कमरुद्दीन ह्याने नविन बांधकाम सुरु असलेल्या घरातुन ईलेक्ट्रीक वायर व केबल फिटींग झालेले चोरले आहे व त्या वायर ला जाळुन त्यातील तांबा काढुन विक्री केले आहे.

अशा माहीती वरुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याची सखोल चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार नामे जहीर खान उर्फ राजा नाडा वल्व जमिर खान रा. अकबर नगर



अमरावती व शेख अबरार उर्फ येडा शेख मुक्तार रा. गुलजार नगर अमरावती यांनी तिन ठिकाणी ईलेक्ट्रीक वायर ची चोरी केली होते व त्या वायरला जाळुन त्यातील तांबे काढुन जवाहर गेट येथील स्क्रैब दुकानात विकले होते. वरुन जवाहर गेट येथील स्क्रैब दुकान मालका कडुन १२ किले ईलेक्ट्रीक वायर मधील तांबा जप्त करण्यात आला.

सदर आरोपी ने चौकशीअंती हल्लीच्या काळात खालील प्रमाणे तिन गुन्हे केल्याचे कबुली दिली आहे.

त्याच प्रमाणे सदर आरोपी हा यापुर्वि केलेल्या खालील प्रमाणे गुन्ह्यात फरार होता. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे शेख अझरुद्दीन शेख कमरुद्दीन वय २२ वर्ष रा. गुलजार नगर असे आहे.

फरार आरोपी: जहीर खान उर्फ राजा नाडा वल्द जमिर खान रा. अकबर नगर अमरावती, शेख अबरार उर्फ येडा शेख मुक्तार रा. गुलजार नगर अमरावती हा आहे.

सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त, . राकेश ओला, यांचे मार्गदर्शनाखाली, मा. पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०१) गणेश शिंदे. उपआयुक्त (मुख्यालय) . रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०२). श्याम घुगे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे विभाग) . शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निराक्षक संदिप चव्हाण, गुन्हे शाखा, यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि मनिष वाकोडे, पोहवा सतिष देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, पोलीस नाईक नाझीमोद्दीन सैय्यद, पोलीस रणजित गावंडे, चालक पोकों प्रभात पोकडे गुन्हे शाखा यांनी केलेली आहे.

## जिल्ह्यात मुबलक इंधनसाठा उपलब्ध; अफवांवर विश्वास ठेऊ नये : जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती:** गेल्या काही दिवसांपासून इंधन टंचाईबाबत पसरत असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने नागरिकांना महत्वाचे आवाहन केले आहे. जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा समाधानकारक साठा उपलब्ध असून पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

इंधन टंचाईबाबत नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या माहितीला बळी पडून घाबरून जाऊ नये. केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. तसेच नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी टाळावी. इंधनाची साठवणूक करण्यात येऊ नये. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, यामुळे सर्वांना इंधनाचा पुरवठा सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे.

इंधन कंपन्यांच्या आजच्या सद्यस्थितीनुसार इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि नायरा या कंपन्यांकडून इंधनाचा पुरवठा विनाअडथळा सुरू आहे. भारत पेट्रोलियमकडे पेट्रोल ४०० केएल, डिझेल ४५० केएल, हिंदुस्थान पेट्रोलियमकडे पेट्रोल ३२० केएल, डिझेल २८४ केएल, इंडियन ऑईलकडे पेट्रोल ५०० केएल, डिझेल ५५० केएल, नायराकडे पेट्रोल ३८५ केएल, डिझेल २७५ केएल इंधनसाठा आहे.

इंधनाबाबत काही अडचण असल्यास संपर्क अधिकारी जाहिर करण्यात आले आहे. भारत पेट्रोलियमसाठी रवी चव्हाण ८८७९६५६५८२, हिंदुस्थान पेट्रोलियमसाठी अंकित पटेल ९५८९२५७२६०, इंडियन ऑईलसाठी विलास डिग्रसे ९४२३५८५४११, नायरासाठी आकाश मिश्रा ८५३०७५८३६९ यांच्याशी संपर्क साधता येणार आहे.

यासोबतच पेट्रोल ५३३ केएल आणि डिझेल ७४२ केएल इंधन मार्गावर असून त्याचा पुरवठा देखील वेळेत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी इंधन भरण्यासाठी पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

## चिखलदरा येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात १४२ उमेदवारांची प्राथमिक निवड

### आदिवासी तरुणांनी जागतिक स्तरावर झेप घेण्याचे आमदार केवल कुमार काळे यांचे आवाहन

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती:** मेळघाटच्या दुर्गम भागातील तरुणांमध्ये जिद्द आहे. या तरुणांनी आता केवळ स्थानिक रोजगारावर समाधान न मानता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगारासाठी सज्ज व्हावे. प्रशासकीय यंत्रणा तुमच्या पाठीशी उभी आहे, असे प्रतिपादन आमदार केवल कुमार काळे यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती आणि सिपना कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच चिखलदरा येथे संपन्न झालेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या प्रसंगी श्री. काळे बोलत होते.

यावेळी सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर, सुभाष गुल्हाने, प्रा. कान्हू , पंकज कचरे तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या मेळाव्यात बी.व्ही.जी. इंडिया, नवभारत फर्टिलायझर, सनलाईट सोलर आणि प्रेसिजन मार्चिंग यांसारख्या ८ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता. एकूण २५५ रिक्त पदांसाठी ३४६ उमेदवारांनी नोंदणी केली. प्रत्यक्ष मुलाखतीनंतर १४२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर २ उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते तात्काळ नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली.

सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आपल्या प्रास्ताविकात धारणी आणि चिखलदरा भागातील उमेदवारांसाठी रोजगार मेळावे घेण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कान्हू यांनी तर आभार प्रा. ढगे यांनी मानले.

## जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी 'टीबी मुक्त भारत अभियान' टप्पा २ चा शुभारंभ

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती** : जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून अमरावती जिल्ह्यात 'टीबी मुक्त भारत अभियान टप्पा २' चा शुभारंभ करण्यात आला. आरोग्य व कुटुंब कल्याण व प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथे आयोजित या विशेष सोहळ्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी जिल्ह्याला क्षयरोगमुक्त करण्यासाठी सूक्ष्म नियोजनावर भर देण्याचे आवाहन केले.

जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल सिरसागर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद निरवणे, आरोग्य प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य डॉ. जोत्सना पोटपिटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय पवार आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड आदी यावेळी उपस्थित होते.

जगभरात २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून जिल्हा आरोग्य विभागाने अभियानाचा दुसरा टप्पा अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. उद्घाटन प्रसंगी श्रीमती महापात्र म्हणाल्या, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. हा उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचून क्षयरोगाचे निर्मूलन करणे हे आपले ध्येय असल्याचे त्या यावेळी म्हणाल्या. डॉ. रमेश बनसोड यांनी प्रास्ताविकेतून अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याची रूपरेषा मांडली. या टप्प्यात जास्तीत जास्त रुग्णांचा शोध घेणे, त्यांना वेळेवर औषधोपचार उपलब्ध करून देणे आणि 'निक्षय मित्र' योजनेच्या माध्यमातून सामाजिक सहभाग वाढवणे यावर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे सांगितले.


## धारणी येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

### मेळघाटच्या विकासासाठी रोजगार मेळावा महत्त्वपूर्ण असल्याचे आमदार केवलराम काळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती, मॉडेल करिअर सेंटर आणि व्हिजन एज्युकेशन अकादमी, धारणी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच मातोश्री इंदिरा महाविद्यालयाच्या रंग भवन सभागृहात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार केवलराम काळे आणि धारणीचे प्रकल्प संचालक सिद्धार्थ शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी



महाराज आणि भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना आमदार केवलराम काळे म्हणाले की, मेळघाटमध्ये मोठ्या स्वरूपाच्या रोजगार मेळाव्याचे आयोजन होत आहे. या दुर्गम आणि आदिवासी भागाचा खऱ्या अर्थाने विकास हा तरुणांना रोजगार मिळाल्यानेच होऊ शकतो. त्यामुळे विविध कंपन्यांनी या भागातील उमेदवारांना संधी देऊन मेळघाटच्या प्रगतीला हातभार लावावा. सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आपल्या प्रास्ताविकेत धारणी आणि चिखलदरा सारख्या आदिवासी पट्ट्यात यापुढेही रोजगार मेळावे आयोजित करण्याचे आश्वासन दिले. या मेळाव्यात स्विगी, नवभारत फर्टिलायझर, जावील सर्किट, टी.एस.पी.एल. यांसारख्या एकूण २० नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. ३५५ रिक्त पदांसाठी ५१४ उमेदवारांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी ११३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. ५ उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते तात्काळ नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व्हिजन अकादमीचे राजकिशोर मालवीय होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुणाल मालवीय, सुभाष गुल्हाने आणि महाविद्यालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आकांशा प्रभे यांनी तर आभार प्रा. सोनकर यांनी मानले.

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ३८ उमेदवारांना मिळाली संधी

प्रतिनिधी २७ मार्च

**अमरावती:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा' संपन्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच. आर. देशमुख आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक



डॉ. नितीन कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली नाही तर खचून जाऊ नका, उलट नव्या जिद्दीने पुन्हा सुरुवात करण्याचा संदेश दिला. डॉ. कोळी यांनी तरुणांना केवळ नोकरी मिळवणारे न होता, नोकरी देणारे (उद्योजक) बनण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यात टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ही कंपनी होती.

प्रास्ताविक करताना डॉ. राजीव बोरकर यांनी सांगितले की, टीसीएस मध्ये काम करण्याचे अनेकांचे स्वप्न असते, जे पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. या मेळाव्यात २०० रिक्त पदांसाठी एकूण २८८ उमेदवारांनी सहभाग नोंदविला होता. निवड प्रक्रियेअंती ११२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर ३८ उमेदवारांना अंतिम निवडीचे पत्र देण्यात आले. सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आभार मानले.

# पोलिस सरंक्षणात पेट्रोल विक्री, दुपार पासून नव्हते तिन्ही पंपावर पेट्रोल

**हिवरखेड :** येथे सुद्धा पेट्रोल डिझेलचा तुटवडा भासत असून गावात तिनं पपं आहेत. या तिन्ही पंपावर दिवसभर पेट्रोल नव्हते तर संध्याकाळी तेल्हारा रोडवरील सोनवाडी फाट्या नजीक पेट्रोल पंपवर पेट्रोल डीझेलचा ट्रक आला. मात्र याकरिता लांबलचक अशी लाईन लागली.

ते पण पोलिस सुरक्षा मध्ये अनेक व्यापारी व्यावसायिक ग्राहक या लाईन मध्ये किती तरी तास उभे राहिले, हा प्रश्नन शासनाने सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी ग्राहक वर्गाकडून केली जात आहे.

## प्रभातचे बॉक्सर राष्ट्रीयस्तरावर चमकले



**अकोला :** प्रभात किड्स स्कूलच्या तिन खेळाडूंनी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सींग स्पर्धेमध्ये विशेष यश संपादन केले.शाश्वत महल्ले व ईशिका झांबरे यांनी सुवर्ण पदक पटकाविले तर गार्गी राऊत हिने कांस्य पदक पटकावनू उत्कृष्ट यश संपादीत केले. महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनशी संलग्न बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित महाराष्ट्र बॉक्सिंग संघ निवड चाचणी स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर बॉक्सिंग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने साई, राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र छत्रपती संभाजीनगरात अंडर १७ मुले व मुलींच्या स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलचा शाश्वत महल्ले ६६ किलो वजनगटात व ईशिका झांबरे ४६ किलो वजनगटातून सुवर्ण पदक पटकाविले. तर गार्गी राऊत हिने ५७ किलो वजनगटात कांस्यपदक पटकाविले.

## जिल्हास्तरीय ६ एप्रिल रोजी लोकशाहीदिन

**अकोला:** जिल्हास्तरीय लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिन दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिनाचे आयोजन करण्यात येते. जिल्हास्तरीय लोकशाहीदिनासाठी तालुका लोकशाहीदिनानंतर व जिल्हा लोकशाहीदिनाच्या १५ दिवस आधी दोन प्रतीत अर्ज पाठविणे आवश्यक आहे. संबंधितांनी विहित नमुन्यात अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### सौ. सरोज दिगंबर



**अकोला:** येथील देवरावबाबा चाळीतील रहिवासी सौ. सरोज देवराव दिगंबर यांचे काल रात्री वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती आणि मनीष, निलेश, राम व श्याम ही मुले व मोठा आप्त परिवार आहे.

# श्री पूर्ण राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला:** चैतन्य सोसायटीतील श्री पूर्ण राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या उत्सवात दररोज धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गुढीपाडव्याच्या दिवशी वेदमंत्रजागर, वैदिकांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दररोज विविध भजनी मंडळांचे भजन, श्री सागर मुदगल यांचा गोंधळ, अकोला पुष्करणा युवाशील ग्रुपचे हनुमान चालीसा पठण, तसेच सौ. ज्योतीताई भुसारी यांचा 'श्रीराम-श्रीश्याम' स्वनाम भजन संध्या असे कार्यक्रम सुरू होते.



श्रीराम जन्मोत्सवानिमित्त ह.भ.प. सुमन महल्ले यांनी श्रीराम जन्माचे कीर्तन केले. मंदिरासाठी सहाय्य करणारे तसेच दररोज रामायण वाचन करणाऱ्या सौ. मनीषाताई नाईक यांचा गौरव करण्यात आला. तसेच आजच्या श्रीराम अभिषेक व पूजेसाठी श्री व सौ. दिनेश खंडेलवाल, आरती करणारे समीर थोडगे, नगरसेवक विजय इंगळे यांच्या हस्ते सेवेकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अभिषेक मानोरकर व मयूर ठाकूर यांच्या प्रगतीबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्माचे कीर्तन, पाळणा, महाआरती आणि त्यानंतर प्रसाद वितरण करण्यात आले.

जीवन कला मंडळाचे अध्यक्ष सुरेश अग्रवाल, प्रदीप गाडगीळ, अभिषेक व अभिजीत मानोरकर, वैद्य, किल्लेदार, तसेच नारी फोरम शाखा अकोलाच्या अध्यक्षा सौ. प्रज्ञा गाडगीळ, सर्व उपासक आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फ्रेंड सर्कल अभ्यासिकेचे यश

प्रतिनिधी २७ मार्च



**अडगाव बु.:** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अशक्य गोष्टही शक्य करता येते, हे येथील 'फ्रेंड सर्कल अभ्यासिके'च्या विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखवले आहे. तब्बल १५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर गावातील तरुण अमित दिलीप राखोंडे याची पोलीस दलात निवड झाली. या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

१५ वर्षांपासून गावातून कोणीही पोलीस दलात भरती झाले नव्हते, तो 'दुष्काळ' अमितने संपवला आहे. त्याच्या या निवडीमुळे गावातील इतर तरुण मुलांमध्येही आता पोलीस भरती आणि स्पर्धा परीक्षांबाबत मोठी उमेद निर्माण झाली आहे.

अमितच्या यशात अडगाव बु. येथील 'फ्रेंड सर्कल अभ्यासिके'चा मोलाचा वाटा आहे. या अभ्यासिकेचे प्रमुख निलेश देऊळकार यांच्या मार्गदर्शनाखाली अमितने आपल्या अभ्यासाचे नियोजन केले होते. 'ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षेसाठी योग्य व्यासपीठ मिळावे या हेतूने सुरू केलेल्या अभ्यासिकेला अमितच्या रूपाने मोठे यश मिळाले आहे,' अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. अमितने आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय अभ्यासाचे वातावरण निर्माण करणारे निलेश देऊळकार यांना दिले आहे.

# बहुजन चळवळीचा निष्ठावान सैनिक हरपला : प्रा. जोगेंद्र कवाडे

प्रतिनिधी २७ मार्च

**बोरगाव मंजू :** सिद्धार्थ नगर येथील पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अकोला तालुका अध्यक्ष स्व. अशोक बबनराव वानखडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या अकाली निधनाने बहुजन चळवळीचा निष्ठावान सैनिक हरपला अशी संवेदना पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी व्यक्त केली.

प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सिद्धार्थ नगरातील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली. आणि कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी वानखडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. प्रा. कवाडे म्हणाले, 'अशोक वानखडे हे बहुजन चळवळीतील अत्यंत निष्ठावान व कर्तव्यदक्ष कार्यकर्ते होते. त्यांनी वंचित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहील.' प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी अशोक वानखडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ परिवाराला अभ्यासिका सुरु करण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी स्व. वानखडे यांच्या कुटुंबियांना धीर देत त्यांच्या दोन्ही मुले अभिषेक व आदित्य यांना 'मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे,' असे आश्वासन दिले. या प्रसंगी चरणदास इंगोले, अनिल गवई यांनीही कुटुंबियांचे सांत्वन करून दिलासा दिला. सांत्वन कार्यक्रमाला संजय वानखडे, सखाराम वानखडे, सचिन वानखडे, अजय-विजय वानखडे, अश्विन ढवळे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी स्व. अशोक वानखडे यांच्या कार्याची आठवण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाने केवळ दुःख व्यक्त केले नाही, तर वानखडे कुटुंबियांसोबत संपूर्ण समाज ठामपणे उभा असल्याचा संदेशही दिला.

## वानखडे कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट



# डॉ. दिवाकर आचार्य यांच्या 'पीळ' कादंबरीस राज्यस्तरीय उत्कृष्टतेचा पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला:** येथील दंतशल्य चिकित्सक डॉ. दिवाकर कृष्ण आचार्य यांच्या 'पीळ' कादंबरीस उत्कृष्ट कादंबरीचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात नवनव्या उपक्रमांसाठी वर्धा येथील मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठान प्रसिद्ध आहे. या प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२६ च्या राज्यस्तरीय 'मारोतराव नारायणे स्मृती' पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली असून त्यात उत्कृष्ट कादंबरी चा पुरस्कार डॉ. दिवाकर आचार्य यांनी लिहिलेल्या 'पीळ' कादंबरीस जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कार निवड समितीचे परीक्षक म्हणून नाशिक येथील कादंबरीकार राकेश वानखडे, नागपूर येथील शांती विद्या भवन चे प्राचार्य व प्रख्यात समीक्षक डॉ. प्रकाश राठोड तसेच पुरस्कार संयोजन समितीचे सदस्य डॉ. संदीप भेले, किशोर पेटकर व सूर्यकांत पाटील यांनी काम पाहिले. मारोतरावं नारायणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त २५ एप्रिल २०२६ रोजी वर्धा येथील एका भव्यसमारंभात डॉ. आचार्य यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येईल.







दिवाकर कृष्ण आचार्य व्यवसायाने डॉक्टर असले तरी साहित्य व लेखन क्षेत्रात त्यांचे प्रचंड योगदान आहे. त्यांनी लिहिलेल्या अनेक कथा, कादंबऱ्या व विविध लेखांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या 'माइल्स टू गो' या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचाठ सर्वोत्कृष्ट साहित्य निर्मिती चा पुरस्कार मिळालेला आहे. डॉ. दिवाकर आचार्य यांना या 'पीळ' कादंबरीची कल्पना सर्वप्रथम १९८० च्या दरम्यान सुचली. व त्यानंतर या विषयाचा अभ्यास व संशोधन करून पाच वर्षांपूर्वी त्यांनी या कादंबरीचे लिखाण सुरू केले होते. पशुवैद्य आणि त्यांचा पशुंसोबत असलेला भावनिक बंध हा विषय मराठी साहित्य क्षेत्राला अपरिचित आहे. या कादंबरीमध्ये दोन समांतर विश्व आहेत. एक म्हणजे स्वतःचे स्वतंत्र स्वभाव असलेल्या माणसाचे आणि दुसरे म्हणजे तेवढेच स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या जनावराचे. पशुवैद्य असलेला डॉक्टर अर्जुन या कथानकाचा नायक तर अडलेली म्हैस 'लक्ष्मी' या कथानकाची दुसरी नायिका. भूमी, स्त्री आणि म्हैस या तिन्ही सृजन तत्त्वांची वेदना एकच असते. हे अधोरेखित करणारी ही कादंबरी शोषण, भय, अपमान, दुःख, वेदना, अहंकार यांचे वेगवेगळे 'पीळ' उलगडत जाते.

त्यात सोबत पश्चिम वऱ्हाडांमधील ग्रामीण कृषीवल जीवन आणि लोकभाषा यांचे अस्सल आणि वास्तववादी जीवन या 'पीळ' कादंबरीतून बघावयास मिळते.

या पुरस्काराबद्दल अकोल्याच्या साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त होत असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# स्वयंभू महादेव मंदिरात दैवी विवाह सोहळा उत्साहात

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला:** अंत्री-मलकापूर येथील स्वयंभू शंभू महादेव मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही महादेव-पार्वतीच्या दैवी विवाह सोहळ्याचा भव्य आणि भक्तिमय कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. महाशिवरात्रीप्रमाणेच हा उत्सवही मंदिर परिसरात अत्यंत जल्लोषात आणि श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला.

सोहळ्याची सुरुवात पहाटे महादेवाच्या अभिषेकाने झाली. भगवान शंकरांना विधिवत स्नान घालून त्यांना फुलांचा शृंगार, अलंकार व विशेष वेशभूषा करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने हळदीचा कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये महिला व गावकरी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. संपूर्ण मंदिर परिसर आकर्षक सजावटीने उजळून निघाला होता.

यानंतर वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात आणि ‰हर हर महादेव‰च्या जयघोषात नवरा-नवरीची मिरवणूक काढण्यात आली. पार्वती मातेसारख्या वेशभूषेत महिला आणि भक्तगण पावल्या खेळत, नाचत-गात मंदिराकडे



आले. या मिरवणुकीने वातावरण भक्तिमय आणि आनंदमय केले.

मंदिरात पोहोचल्यावर मंगलाष्टकांच्या गजरात, सर्व भाविकांच्या साक्षीने महादेव-पार्वतीचा पवित्र विवाह विधी पार पडला. त्यानंतर आरती करण्यात आली आणि सर्वांनी भक्तिभावाने दर्शन घेतले. सोहळ्याच्या समाप्तीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावकरी, महिला, लहान मुले आणि सर्व भाविकांनी एकत्र बसून प्रेमाने महाप्रसादाचा लाभ घेतला. हा विवाह सोहळा केवळ धार्मिक विधी नसून, गावकऱ्यांमधील एकता, प्रेम आणि परंपरेचा सुंदर संगम आहे. स्वयंभू शंभू महादेव मंदिरात असा भव्य सोहळा दरवर्षी पार पडत असून, महाशिवरात्रीप्रमाणेच हा उत्सवही मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

# पातूर तहसील कार्यालयात ग्राहक सभेचे आयोजन

प्रतिनिधी २७ मार्च

**पातुर:** ग्राहक दिनाच्या औचित्याने पातुर तहसील कार्यालयाच्या नव्याने उभारलेल्या इमारतीतील सभागृहात दिनांक २५ मार्च २०२६ रोजी ग्राहक सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला निवासी नायब तहसीलदार विश्वजीत खंदारे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी पुरवठा निरीक्षक शीतल दांदळे-मोरखडे, पातुर तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष देवानंद गहिले तसेच तालुका महिला अध्यक्ष प्रा. सौ. करुणा गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार Dr. Babasaheb Amebdkar ke संत Sant Gadge Baba यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत पातुर व बाळापूर तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.



सभेमध्ये ग्राहकांचे हक्क, त्यांच्याशी संबंधित समस्या तसेच फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी देवानंद गहिले व प्रा. करुणा गवई यांनी ग्राहकांनी जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विशेषतः ऑनलाइन वीज बिल भरताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात विश्वजीत खंदारे यांनी ग्राहकांनी सजग राहून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच स्वस्त धान्य दुकानदार व इतर सेवा पुरवठादारांनी पारदर्शक व्यवहार ठेवावेत, जेणेकरून ग्राहकांना कोणताही त्रास होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीतल दांदळे-मोरखडे यांनी केले. संचालन बाळापूरचे कनिष्ठ लिपिक जगदीश ढगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन परदेशी यांनी मानले. या सभेला पराग खंडारे, अक्षय गोरे, दिपाली चौरे यांच्यासह पातुर व बाळापूर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार, दुलेखान युसुफ खान, पंडितराव देशमुख आणि विविध विभागांचे कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने ग्राहक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# चंदन अग्रवाल यांना स्नेहसंवर्धन पुरस्कार प्रदान



प्रतिनिधी २७ मार्च

**मुर्तीजापुर:** येथील सामाजिक कार्यकर्ते चंदन अग्रवाल यांना स्नेहसंवर्धन पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष असून पहिल्या वर्षी रमेशचंद्र कुर्मी यांना देण्यात आला. चंदन अग्रवाल यांना या अगोदर स्काऊट गाईड क्षेत्रामध्ये राज्यपाल पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कार तसेच पंतप्रधान ढाल सलग तीनदा प्राप्त केली आहे याशिवाय ते अनेक सामाजिक संघटना भक्तीधाम मंदिर ट्रस्ट, मोक्षधाम समिती, महा.राज्य स्काऊट गाईड फेलोशिप, स्वच्छता अभियान ,व्यापारी महासंघ, अ.भा.ग्राहक पंचायत,श्री पुंडलिक बाबा गौरक्षण संस्था, अ विश्व गायत्री परिवारअशा अनेक संस्थेच्या विविध पदावर असून संस्थेच्या माध्यमातून नेहमी समाजकार्यात अग्रेसर असतात त्यांच्या या कार्याची पावती म्हणूनच त्यांना आज हा पुरस्कार

श्री पुंडलिक बाबा यात्रा महोत्सव अंतर्गत जनमंच नागपूर, स्वाभिमानी शेतकरी संघटना, आंतरभारती पुणे, प्रगती शेतकरी मंडळ मूर्तिजापूरच्या सहकार्याने आयोजित दोन दिवसीय कृषी प्रदर्शन दरम्यान साहित्यिक, समीक्षक डॉ.श्रीकांत तिडके यांच्या अध्यक्षतेखाली माजी आमदार सरोजताई काशीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जनमंच नागपूरचे अध्यक्ष राजीव जगताप, सचिव विठ्ठलराव जावळकर ,जागर मंच संस्थापक प्रशांत गावंडे ,संस्थांचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटोंड यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

# अकोला क्रीडा प्रबोधिनीचे ११ खेळाडू राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला:** महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनशी संलग्न- बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित महाराष्ट्र बॉक्सिंग संघ निवड चाचणी स्पर्धा २०२६.



आयोजक -छत्रपती संभाजीनगर जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने साई, राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र बॉक्सिंग संघ निवड चाचणी स्पर्धा. १७ आणि १९ वर्षाखालील मुलामुलींच्या स्पर्धेत अकोला क्रीडा प्रबोधिनीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ११ सुवर्ण, ६ रजत तसेच ८ कांस्य पदक प्राप्त केली. २१ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत महाराष्ट्र बॉक्सिंग संघ निवड चाचणीत स्पर्धेत ळ-१७ जुनिअर मुलांच्या गटात संस्कार आत्राम ४६ किलो वजनगटात, करण माळी ४८ किलो वजनगटात, गोपाल गणेशे ५२ किलो वजनगटात, गौरव दीक्षित ५४ किलो वजनगटात, पार्थ चोपडे ५७ किलो वजनगटात, युगल खोटे ६३ किलो वजनगटात व शाश्वत महल्ले ६६ किलो वजनगटात यांनी सुवर्ण पदक प्राप्त केली तसेच साई संद्री ४६ किलो वजनगटात रजत पदक प्राप्त केले तर त्याचबरोबर जयेश कुंभार ४८ किलो वजनगटात, वैभव दामोदर ५० किलो वजनगटात, गौरांग भरणे ६० किलो वजनगटात कांस्य पदक प्राप्त केली.

मुलीच्या U-१७ जुनिअर गटात इशिका झांबरे ४६ किलो वजनगटात सुवर्ण पदक, अक्षरा खंडारे ६३ किलो वजनगटात रजत पदक तर गार्गी राऊत ५७ किलो आणि कनक अग्रवाल ६६ किलो वजनगटात कांस्य पदक प्राप्त केली.

युथ U-19 गटात मुलाच्या गटात रिजवान शाह ६५ किलो वजनगटात, अथर्व भट्ट ७० किलो वजनगटात, ऋषिकेश चव्हाण ८५ किलो सुवर्ण पदक प्राप्त केली. त्याचबरोबर शिवराज देशमुख ६० किलो वजनगटात रजत पदक तर स्मित राजपूत ६० किलो वजनगटात कांस्य पदक प्राप्त केली.

त्याचबरोबर मुलींच्या ळ-१९ युथ गटात समीक्षा सोळंके ४८ किलो वजनगटात, सुहानी बोराडे ५४ किलो वजनगटात, श्रद्धा राहटकर ५७ किलो वजनगटात रजत पदक तर श्रद्धा खोब्रागडे ५१ किलो वजनगटात, अनुष्का गुप्ता ६० किलो वजनगटात कांस्य पदक प्राप्त केली.

जुनिअर मुले /मुली सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूंची निवड नागपूर येथे होण्याऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तर युथ मुले /मुली सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूंनीची निवड गुहावटी आसाम येथे होण्याऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता झाली आहे. या स्पर्धेत संघासोबत क्रीडा मार्गदर्शक म्हणून बॉक्सिंग प्रशिक्षक गजानन कबीर, आदित्य मने, योगेश निषाद, साद सय्यद यांनी काम पहिल. या सर्व खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी व आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग कोच मा. सतीशचंद्र भट्ट सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी

**एप्रिल ते जून दरम्यान अडीचशे गावांसाठी २९९ उपाययोजना**

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला :** ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. एप्रिल ते जून दरम्यान अडीचशे गावांसाठी २९९ उपाययोजनांचा समावेश असून, कामे वेळेत पूर्ण व्हावीत. कुठेही टंचाई उद्भवणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत. टंचाई आराखड्यात जानेवारी ते मार्च, तसेच एप्रिल ते जून दरम्यान सर्व कामे मिळून २६२ गावांसाठी ३१४ विविध उपाययोजना व त्यासाठी चार कोटी २७ लक्ष ४० हजार रू. च्या संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. जानेवारी ते मार्चदरम्यान १२ गावांसाठी १५ उपाययोजनांचा समावेश करण्यात आला. आराखड्यात अकोला तालुक्यातील १६, बार्शीटाकळी तालुक्यातील ६७, बाळापूर तालुक्यातील २३, पातूर तालुक्यातील ५६, मूर्तिजापूर तालुक्यातील ३९, अकोट तालुक्यातील ३३ व तेल्हारा तालुक्यातील २८ अशा एकूण २६२ गावांचा समावेश आहे. विहिर अधिग्रहणाची १२७, विहीर खोलीकरण, गाळ काढणे ९, नळयोजना विशेष दुरूस्ती १०, विंधनविहीर विशेष दुरूस्ती ९२, नवीन विंधन विहीर ४६, कूपनिका २६, रिचार्ज शाफ्ट, नाला खोलीकरण ४ अशी एकूण ३१४ कामे आहेत. नळयोजना विशेष दुरूस्तीच्या कामांमध्ये अकोला तालुक्यातील काही गावांचा समावेश आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# 'रामजीकी निकली सवारी'

## जय श्रीरामच्या जयघोषाने उमरखेड दुमदुमले

प्रतिनिधी २७ मार्च





**उमरखेड** : श्रीराम जन्मोत्सवानिमित्त शहरात भव्य आणि उत्साहपूर्ण मिरवणुका काढण्यात येत औदुंबर नगरी 'जय श्रीराम'च्या घोषणांनी दुमदुमून गेली. सार्वजनिक समित्या, जयश्रीराम समिती आणि शिवप्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

शहरातील प्रमुख मार्गांवरून मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांच्या भव्य प्रतिमेची सजविलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली.

यामध्ये द्रोणागिरी पर्वत उचलून उड्डाण करणाऱ्या हनुमान यांची आकर्षक प्रतिकृती, नृसिंह अवतार तसेच विविध देखावे आणि भव्य झाक्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

भजनी मंडळी, ढोल-ताशांच्या गजरात आणि वाद्यवृंदाच्या तालावर तरुणाई थिरकत होती. दुपारच्या उन्हातही मोठ्या संख्येने रामभक्तांनी मिरवणुकीत सहभाग घेत उत्साहात भर घातली.

साई मंदिर, श्रीराम मंदिर तसेच स्टेट बँक कॉलनी येथून सकाळी १० वाजल्यापासून विविध समित्यांच्या मिरवणुका निघाल्या.

शहरासह ग्रामीण भागातील आबालवृद्ध, महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आर्णीत जय श्रीरामचा गजर

प्रतिनिधी २७ मार्च





**आर्णी** : श्रीराम नवमीच्या निमित्ताने शहरात काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमुळे संपूर्ण आर्णी नगरी 'जय श्रीराम'च्या घोषणांनी दुमदुमून गेली. श्रीराम नवमी शोभायात्रा समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि हिंदू उत्सव समिती यांच्या वतीने प्रभू श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

गणपती मंदिर, जुनी वस्ती येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून 'राम दरबार' सजविलेल्या रथातून प्रभू श्रीरामांच्या भव्य प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये ११ फूट उंचीची श्रीरामांची मूर्ती विशेष आकर्षण ठरली.

मिरवणुकीत हनुमान यांची वेशभूषा साकारलेले बालक, गोंडी नृत्य, तसेच दुर्गावाहिनीच्या स्वयंसेविकांनी सादर केलेली लाठी-काठीची कला यामुळे वातावरण भारावून गेले. ढोल-ताशांच्या निनादात आणि विविध आकर्षक झांकींसह निघालेल्या मिरवणुकीत रामभक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले.

सायंकाळी ६ वाजल्यापासून सुरू झालेल्या या शोभायात्रेत शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. वाद्यांच्या तालावर 'जय श्रीराम'च्या जयघोषात तरुणाई थिरकत होती.

अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. शोभायात्रेची सांगता श्रीराम मंदिर, ग्रीन पार्क येथे भव्य महाआरतीने करण्यात आली.

# श्रीराम नवमीनिमित्त पूजा-अर्चना; पानपोई उपक्रमाचा शुभारंभ

प्रतिनिधी २७ मार्च




**आर्णी** : श्रीराम नवमीच्या निमित्ताने जवळा गावात धार्मिक व सेवाभावी वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी भगवान श्रीराम तसेच श्री अप्पा स्वामी महाराज यांचे दर्शन घेऊन विधिवत पूजा-अर्चना करण्यात आली.

त्यानंतर गाव व परिसरातील नागरिकांच्या सेवेसाठी पानपोई उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन श्री राजेश आडे व सौ. नीताताई आडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी बंडू नागापूरे, नंदू देशमुख, रमेश कोरटकर, तुळशीराम कोटमकार, संतोष जयस्वाल, दिलीप नागापूरे, विजय सोळंके, गणेश ऐकंडवार, अविनाश ढाकूलकार, गजानन ईरतकर, नाना चोपडे, अनिल कोळेकर, संजय सागानी, मधुकर वट्टमवार, बंडू चोपडे, खेमसिंग राठोड, संजय पांडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल गावकऱ्यांनी आयोजक राजेश आडे व नीताताई आडे यांचे आभार मानले.

# ग्रामसेवकाच्या वक्तव्यावरुन वाद; निलंबनाची मागणी

प्रतिनिधी २७ मार्च

**पांढरकवडा** : कोलाम समाजाच्या बांधवांशी कथित अपमानास्पद वक्तव्य केल्याच्या आरोपावरून ग्रामसेवकाविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून, संबंधित ग्रामसेवकाला तात्काळ निलंबित करावे, अन्यथा पंचायत समिती कार्यालयावर हजारोंच्या संख्येने मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते अतुल आत्राम यांनी दिला आहे.

माहितीनुसार, कोलाम समाजातील नागरिक आपल्या मागण्यांसाठी पंचायत समिती पांढरकवडा येथे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी गेले होते. यावेळी ग्रामसेवकाने समाजातील बांधवांशी अयोग्य भाषेत बोलून त्यांचा अपमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी उपस्थित असलेल्या शामा दादा कोलाम ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा इंद्राताई बोंद्रे यांनी संबंधित ग्रामसेवकाला जाब विचारला असता समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे सांगण्यात आले.

कोलाम समाज हा शांतताप्रिय असून, अन्याय सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करत संबंधित ग्रामसेवकावर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.

यावेळी राहुल चिचघाटे, गुरुदेव घोडनारे, सुनील टेकाम, अंकुश ढोबळे, हरिदास मानकर, पुंडलिक टेकाम, गंगाराम मडावी, कृष्णा टेकाम, विष्णु सुरपाम, आकाश जिलटे, वैभव घोडाम, सौरभ मरोस्कोले, समीर सुरपाम आदी उपस्थित होते.

# 'जय मुंगसाजी माऊली'च्या गजरात देवगाव दुमदुमले

## भागवत कथेचा भक्तिमय समारोप

प्रतिनिधी २७ मार्च





**आर्णी** : तालुक्यातील देवगाव येथे गुढीपाडवा ते श्रीराम नवमी या कालावधीत आयोजित श्रीमद भागवत संगीतमय जीवनामृत कथा तथा ज्ञानयज्ञाचा समारोप २६ मार्च रोजी मोठ्या भक्तीभावात करण्यात आला. यावेळी 'जय माऊली, जय मुंगसाजी माऊली'च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

श्रीक्षेत्र धामणगाव निवासी परमहंस मुंगसाजी माऊली यांच्या प्रगटदिनानिमित्त १९ मार्चपासून ह.भ.प. शुभम महाराज कुडवे (पंढरपूर) यांच्या अमृतमय वाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. आठवडाभर चाललेल्या या कथेतून माऊलींच्या लीलांचे दर्शन झांकींच्या माध्यमातून घडविण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

समारोपाच्या दिवशी श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर सकाळी ९ वाजता माऊलींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत देवगाव व परिसरातील भाविक-भक्तांचा मोठा सहभाग होता. वारकरी संप्रदायाच्या भजन-कीर्तनाच्या तालावर भक्त तल्लीन झाले होते.

गावभर रांगोळ्या काढून आणि दिवे लावून मिरवणुकीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. संपूर्ण देवगाव नगरीत उत्सवाचे वातावरण असून एकप्रकारे दिवाळीच साजरी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दुपारी १२ वाजता ह.भ.प. शुभम महाराज कुडवे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या भागवत कथा व ज्ञानयज्ञाचा समारोप करण्यात आला.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी दहा वर्ष सश्रम कारावास

## केळापूर न्यायालयाचा निकाल; पाच हजार दंड

प्रतिनिधी २७ मार्च

**पांढरकवडा** : लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीस विशेष न्यायालयाने १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. ही घटना कृष्णापूर (ता. केळापूर) येथे घडली होती.

आरोपी विकास आनंदराव सुरपाम याने पीडितेवर आपले खूप प्रेम असल्याचे सांगून लग्नाचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडलेल्या अल्पवयीन पीडितेवर त्याने वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. पीडिता चार महिन्यांची गर्भवती असताना तिने आरोपीकडे लग्नाची मागणी केली. मात्र, आरोपीने लग्न करण्यास टाळाटाळ केली व तुझ्याने काय होते ते करून घे, अशी धमकी दिली. यामुळे पीडितेने नाईलाजाने पांढरकवड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिस उपनिरीक्षक संजीव खंदारे यांनी तपास केला. विशेष न्यायालय, केळापूर येथे चाललेल्या या खटल्यात न्यायालयाने सात साक्षीदार तपासले. पीडिता वैद्यकीय अधिकारी, तपास अधिकारी व इतर परिस्थितीजन्य पुराव्यांच्य आधारे आरोपीस दोषी ठरविले अतिरिक्त सत्र न्यायाधीश अभिजीत देशमुख यांनी २५ मार्च रोजी निकाल दिला. आरोपीस पोक्सो कायदा कलम ६ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रूपये दंड, एक वर्ष सश्रम कारावास व एक हजार रुपये दंड तसेच कलम ५०६ अन्वये एक वर्ष सश्रम कारावास व पाचशे रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सर्व शिक्षा एकत्रित भोगाव्या लागतील.

# येत्या रविवारी यवतमाळ ऑयडॉलचे ऑडिशन

## विदर्भस्तरीय गीत गायन स्पर्धा; नोंदणी 28 मार्चपर्यंत सुरू राहणार

प्रतिनिधी २७ मार्च




**यवतमाळ** : क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळात 'समता पर्व-2026' अंतर्गत 'यवतमाळ आयडॉल'या विदर्भस्तरीय भव्य गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे ऑडिशन येत्या रविवारी, दि. 29 मार्च 2026 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत स्थानिक संविधान चौकातील 'लॉर्ड बुद्धा'कार्यालयात होणार आहे.

नवोदित कलावंतांना संगीताचा मोठा मंच मिळवून देण्यासाठी समता पर्व प्रतिष्ठानने हा पुढाकार घेतला आहे. स्पर्धेचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. माधुरी आडे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल आडे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थुल, डॉ. विलास कनाके, उमेश मेश्राम, प्रमोदनी रामटेके, डॉ. सुमेध देवतळे आणि माजी अध्यक्ष माधुरी वाळके यांची प्रमुख उपस्थिती राहील. या स्पर्धेतील नोंदणीचा कालावधी दि. 14 ते 28 मार्चपर्यंत आहे. तसेच वयोगट 15 ते 35 वर्षे असून नोंदणी फी नाममात्र 300 रुपये आहे. ऑडिशननंतर निवडक स्पर्धकांसाठी पहिली फेरी 9 एप्रिल, दुसरी फेरी 11 एप्रिल आणि अंतिम फेरी 13 एप्रिल 2026 रोजी समता मैदान, यवतमाळ येथे पार पडेल. या उपक्रमासाठी मुख्य संयोजक धर्मपाल भितकर व काजल तायडे यांच्यासह सहसंयोजक विजय डोंगरे, बळीराम अडागळे व संयोजन समितीचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. नाव नोंदणीसाठी इच्छुकांनी 9881619393 किंवा 8605907635 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन धर्मपाल भीतकर यांनी केले आहे. या स्पर्धेसाठी जया तेलंग, हर्षा बोडखे, माया हलवले, रीना वानखडे, शुभम वाळके, प्रा. विजय डोंगरे, रवी श्रीरामे, रवी बावनगडे, दीपाली बावनगडे, नंदकिशोर निमगडे, शिवदास कांबळे, प्रतिभा दातार आदींनी पुढाकार घेतला आहे.

### स्पर्धेची रूपरेषा आणि बक्षिसे

- या स्पर्धेत प्रथम विजेत्यास 22,022 रुपये, द्वितीय 11,011 रुपये आणि तृतीय विजेत्यास 5,505 रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. ही बक्षिसे अनिल आडे यांनी स्मृतिशेष रामजी आडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कृत केली आहेत. याशिवाय विविध मान्यवरांकडून प्रोत्साहनपर बक्षिसेही दिली जाणार आहेत.

# डॉ. फरहाना आझमी यांची उर्दू पीएच.डी.मार्गदर्शकपदी नियुक्ती

प्रतिनिधी २७ मार्च



**दारव्हा** : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी उर्दू व फारसी विषयातील संशोधनाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत पाच प्राध्यापकांना पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. यामध्ये दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या उर्दू विभाग प्रमुख प्रा. डॉ. फरहाना आझमी यांचा समावेश आहे.

यवतमाळ जिल्ह्यात उर्दू विषयासाठी दीर्घकाळापासून एकही संशोधक मार्गदर्शक उपलब्ध नव्हता. त्यामुळे संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. डॉ. आझमी यांच्या नियुक्तीमुळे ही उणीव भरून निघाली असून परिसरात आनंदाचे वातावरण आहे. विद्यापीठाच्या निर्णयामुळे उर्दू व फारसी विषयात पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवरच मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. यामुळे संशोधन कार्याला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

दरम्यान, इतर मान्यताप्राप्त मार्गदर्शकांमध्ये डॉ. मोहम्मद अझीमुद्दीन (येवदा), प्रा. डॉ. अंजुम नाहीद (मंगरूळपीर), डॉ. नुझहत परवीन (अमरावती) आणि डॉ. सय्यद रमीज (मंगरूळपीर) यांचा समावेश आहे. या सर्व शिक्षकांच्या नियुक्तीबद्दल शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत असून संबंधित महाविद्यालयांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दर्जेदार संशोधन घडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अनुसूचित जमातींच्या यादीत सुधारणा आवश्यक

प्रतिनिधी २७ मार्च

**झरी** : भारतीय राज्यघटनेच्या कलम 342 अंतर्गत महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या यादीत प्रारंभी केवळ 48 जमातींचा समावेश होता. मात्र, राज्य पुनर्गठन कायद्याच्या तरतुदींनंतर विविध राज्यांतील भाग महाराष्ट्रात विलीन झाल्याने सुमारे 135 पोटजातींचाही समावेश करण्यात आला. यात विदर्भ (मध्यप्रदेश), मराठवाडा (आंध्रप्रदेश) आणि गुजरातमधील काही भागांचा समावेश झाल्यानंतर त्या-त्या भागातील अनुसूचित जमातींचा महाराष्ट्राच्या यादीत समावेश झाला.

तज्ज्ञांच्या मते, या प्रक्रियेदरम्यान सखोल सामाजिक-आर्थिक अभ्यास न करता केवळ भौगोलिक निकषांच्या आधारे अनेक जातींचा समावेश करण्यात आला. परिणामी, गोंडाची उपजात म्हणून माना, कोलामाची उपजात म्हणून मन्नेरवारलु, तसेच ओरावनची उपजात म्हणून धांगड यांसारख्या काही जातींना 'पाठीमागील दारातून' प्रवेश मिळाल्याची टीका होत आहे. विशेष म्हणजे, या काही जातींचे महाराष्ट्रात स्वतंत्र अस्तित्व नसल्याचा दावा केला जात आहे.

दरम्यान, अनुसूचित जमातींसाठी लागू असलेले क्षेत्रबंधन हटविण्याच्या मागणीवर कायद्यात बदल करण्यात आले. गोंड, परधान यांसारख्या जातींसाठी क्षेत्रबंधन हटविणे योग्य मानले गेले, कारण या नावांच्या बिगर-आदिवासी जाती अस्तित्वात नाहीत. मात्र ठाकूर, कोळी महादेव यांसारख्या नावांच्या बिगर-आदिवासी जाती राज्यभर आढळत असल्याने त्यांचे क्षेत्रबंधन पूर्णपणे हटविणे आदिवासी समाजाच्या हिताविरुद्ध ठरत असल्याचे मत व्यक्त होत आहे.

त्यामुळे काही जातींसाठी क्षेत्रबंधन कायम ठेवण्याची मागणी जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर, आदिवासींच्या हक्कांवर परिणाम करणाऱ्या काही जातींची यादीतून वगळणी किंवा आवश्यक सुधारणा करणे अत्यावश्यक असल्याचे मत पुढे येत आहे.

विशेषतः मन्नेरवारलु व माना या जातींना अनुसूचित जमातींच्या यादीतून वगळण्याचा प्रस्ताव 2017 साली शासनाकडे सादर करण्यात आला होता. तसेच 'गोंड' या नावानंतर "including" हा शब्द आणि अल्पविराम पूर्ववत ठेवण्याचाही प्रस्ताव देण्यात आला होता. मात्र, हा प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर प्रलंबित आहे.

याबाबत तत्कालीन आदिवासी विकास मंत्र्यांसह अनेक आदिवासी आमदारांनी निवेदने दिली होती. काही मुद्द्यांवर राज्यपालांकडेही सादरीकरण करण्यात आले, परंतु अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.

सध्या 'ट्रायबल फोरम' ही संघटना या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन निवेदने सादर करणे, तसेच जनजागृती मोहीम राबविण्याचे काम करत आहे. त्यांच्या या प्रयत्नांचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

या संदर्भात माजी आयएएस अधिकारी नरेंद्र कृष्णराव पोयाम यांनी स्पष्टपणे सांगितले की, "अनुसूचित जमातींच्या यादीत आवश्यक त्या सुधारणा आणि वगळणी केल्याशिवाय खऱ्या आदिवासी समाजाला न्याय मिळणार नाही; अन्यथा त्यांचे भविष्य अंधारातच राहील."

# अमरावती विद्यापीठात 'माणुसकीची भिंत'च्या सेवाभावी कार्याचा गौरव

प्रतिनिधी २७ मार्च




**पुसद** : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे २५ मार्च २०२६ रोजी 'संत गाडगे बाबा यांची दशसूत्रे व सेवाभावी संस्थांची भूमिका' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पुसद येथील माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनच्या गेल्या दहा वर्षांपासून सुरू असलेल्या निस्वार्थ सेवाकार्याचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे होते. तसेच व्यासपीठावर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर, अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे आणि माजी विशेष सचिव अनिल जोशी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'माणुसकीची भिंत'चे अध्यक्ष गजानन जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांचा शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गरजवंतांसाठी सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

दरम्यान, कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल फाउंडेशनतर्फे डॉ. दिलीप काळे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी गजानन जाधव, मधुकर चव्हाण, अनंता चतुर, दिगंबर देशमुख, मंगेश भगत, अरुण नागुळकर, मार्गदर्शक प्रकाश येलेकर, 'मिशन ग्रीन पुसद'चे अध्यक्ष रमेश डंबोळे, शिवाजी पोले तसेच मोनिका जाधव, कामिना चतुर, स्वाती भगत, रेखा आगलावे आदी सदस्य उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण

# घरकूल वाटपात अनागोंदी, भ्रष्ट अधिकाऱ्यांची चांदी !

## रिसोड तालुक्यात बोगस लाभार्थ्यांमुळे पात्र लाभार्थी अडचणीत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांतर्गत नेमकं कुठे काय चालु आहे ? याचा ताळमेळच राहिलेला नाही. प्रधानमंत्री आवास योजना ही गोरगरिबांसाठी राबविण्यात येत आहे. त्यासाठी शासनाने निकष सुद्धा ठरवून दिले आहेत, मात्र हे सर्व निकष, नियम धाब्यावर बसवून या महत्वाकांक्षी घरकुल योजनेत अनागोंदी कारभार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. बोगस लाभार्थ्यांची निवड करून भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी अर्धे तुम्ही अर्धे आम्ही या तत्वावर स्वतःची चांदी करून घेत असल्याची चर्चा जनसामान्यात केली जात आहे. परिणामी पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत असल्याची ओरड होत आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेचा मुख्य उद्देश गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेद्वारे शहरी आणि ग्रामीण भागातील बेघर कुटुंबे तसेच कच्चा व मोडकळीस आलेल्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना सुरक्षित आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. परंतु वाशिम जिल्ह्यात या घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याचे चित्र समोर येत असून, रिसोड तालुक्यात या योजनेत मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार सुरू असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. सन २०२४-२५ मधील घरकुल वाटपात खुप मोठा घोळ झाला असल्याची माहिती हाती आली असून दलालांची टोळी सक्रिय असल्याने गरीब



लोकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील लाभार्थी हे पुढील हप्ता मिळेपर्यंत खाजगी कर्ज घेऊन बांधकाम पूर्ण करत आहेत. आणि बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हप्ते मिळविण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात वाऱ्या करत आहेत. परंतु लाभार्थ्यांना सबंधित अधिकारी व कर्मचारी कोणत्याही प्रकारचा थारा लागून देत नाहीत. आणि तेच लाभार्थी जर दलालांमार्फत गेले तर त्यांचे काम लगेचच होते अशी माहिती त्रस्त लाभार्थी देत आहेत. यावरून घरकुल योजनेतील अनागोंदी कारभार अधोरेखित होत आहे. शिवाय रिसोड तालुक्यात हजारो बोगस लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची गंभीर बाब उघडकीस येत असून यात एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांच्या नावावर घरकुल अनुदान देण्यात आले असल्याचे बोलले जात आहे. तर काही ठिकाणी सधन कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या दुर्बळ दाखवून घरकुल अनुदान वितरीत करण्यात आले आहे. ग्रामीण भागात तर हा प्रकार सर्रास सुरू असल्याची माहिती मिळत आहे. आणि या योजनेतील भ्रष्टाचाराचा कळस गाठला तो म्हणजे जे लोकं योजनेच्या निकषात आणि नियमात बसत नाहीत अशा लोकांना ' अर्धे तुम्ही अर्धे आम्ही ' या तत्वावर खिरापत वाटल्याप्रमाणे अनुदान वितरित केले असल्याची धक्कादायक माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. परिणामी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ६०-४० प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात असला तरी योजनेच्या मुख्य उद्देशालाच ' खो ' बसत आहे. सबंधित विभागातील अधिकारी आणि कर्मचारी स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यासाठी गोरगरिबांच्या तोंडाला पाने पुसून दलालांची सुद्धा घरे भरत आहेत. या गंभीर बाबीकडे कर्तव्यदक्ष असलेले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करत आहेत.

### यंत्रणा अजब , कारभार गजब ...

प्रधानमंत्री आवास योजना ही गोरगरीब जनतेला हक्काचे घर मिळवून देण्यासाठी अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. मात्र योजनेतील अनागोंदी कारभारामुळे या योजनेचा फज्जा उडाला आहे. घरकुल एकाच्या नावावर अन्.. अनुदान दुसऱ्याच्याच बँक खात्यात असे अनेक प्रकार समोर येत आहेत. तर काही ठिकाणी ग्राम पंचायत शिपाई जेंव्हा घरकुल पूर्ण झाल्याचा बोर्ड लावण्यासाठी सबंधित लाभार्थ्याच्या घरी पोहचला तेव्हा कुठं त्या लाभार्थ्याला माहिती पडले की आपल्या नावावर कोणीतरी घरकुल घेतले आहे. सबंधित यंत्रणेचा हा गजब कारभार योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. परिणामी सर्व सामान्य लोकांचा शासनावरील विश्वासाला तडा जात आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली तरच भविष्यात होणाऱ्या भ्रष्टाचारास आळा बसेल असे तज्ञ लोकं बोलत आहेत.




## थोडक्यात

### जिल्हास्तरीय जनगणना कक्ष सुरू; प्रक्रियेच्या समन्वयाला गती



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील जनगणना प्रक्रियेचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयन साधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतील तळमजल्यावर जिल्हास्तरीय जनगणना कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज दि.(२६) मार्च रोजी प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या शुभहस्ते पार पडले.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या या कक्षामार्फत जिल्ह्यातील जनगणना कामकाजाचे नियोजनबद्ध पद्धतीने निरीक्षण, समन्वय आणि अंमलबजावणी करण्यात येणार असून, संपूर्ण प्रक्रियेला अधिक गती व पारदर्शकता मिळणार आहे.या प्रसंगी भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, तहसीलदार निलेश पळसकर, प्रतिक्षा तेजनकर, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी उपस्थित होते.

### सर्वांनी सूचनांचे व नियमावलीचे काटेकोर पालन करा-जिल्हाधिकारी




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्याचा मूलभूत पाया आहे, त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जनगणना संचालनालय व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज दि. २६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात करण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. त्यावेळी उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. गजानन वाघ यांनी केले, तर आभार सहाय्यक महसूल अधिकारी अतुल देशमुख यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, नायब तहसीलदार, जनगणना टेक्निकल असिस्टंट, गणनाकर्ते व पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# पवित्र पोर्टल झाले अपवित्र, माध्यमिक शिक्षण विभागाचे चित्र, भरती घोटाळा विचित्र !




*** वाशीम जिल्ह्यात संचमान्यता वाढवून पवित्र पोर्टलमधून शिक्षक भरतीमध्ये गैरप्रकार**
*** शिक्षण विभागातील अधिकारी, संस्थानिक, मुख्याध्यापक, बासरीवाला मालामाल**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्याचा माध्यमिक शिक्षण विभाग मागील अनेक वर्षापासून गैरप्रकारात राज्यात अव्वल स्थानावर बदनाम झालेला आहे.आता पवित्र पोर्टलद्वारे १०० टक्के अनुदानित शाळा, उच्च माध्यमिक शाळेतील रिक्त असलेल्या शिक्षकांची पदभरती सुरु आहे. या पद्धतीमध्ये संचमान्यतेनुसारच रिक्त पदे भरावी लागतात. परंतु वाशीमच्या शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकारी, शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या नसतांना संचमान्यतेत रिक्त पदे वाढवून आणणारा बासरीवाला दलाल, संस्थानिक आणि काही शाळेतील मुख्याध्यापक मालामाल होत असल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे.

मानोरा तालुक्यातील गव्हा येथील माध्यमिक शाळेच्या संस्थाचालकांमध्ये दोन गटात वाद सुरु आहेत.या दोन गटातील वाद चॅरीटी, जांइंट चॅरीटी ,आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुरू असुन ही प्रकरणे न्यायप्रवीष्ठ असल्याचे समजते. दोन गटात वाद असुन एका गटात त्या शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक पीटीआर वर नोंद असलेल्या कार्यकारिणीमध्ये असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.त्यामुळे त्या शाळेचा कारभार मुख्याध्यापकाच्या ईशाऱ्यावर सुरु असल्याची चर्चा आहे. या शाळेत विद्यार्थ्यांची आवश्यक पटसंख्याच नसल्यामुळे शाळेत नविन शिक्षक भरती करण्याचे कारणच नसल्याचे तक्रारकर्त्या गटाचे म्हणणे आहे. तक्रारकर्त्यांच्या एकाही तक्रारीची दखल माध्यमिक शिक्षण विभागातील खाबूगिरीत अव्वल असलेल्या आजी, माजी, प्रभारी अधिकाऱ्यांनी कधीही घेतली नसल्याचा आरोप तक्रारकर्त्या गटाकडून केल्या जात आहे. संस्थेत सुरू असलेल्या अंतर्गत वादाचा फायदा कथित अधिकारी, त्यांच्या पापात भागिदार असलेला बासरीवाला घेतात. संबंधित मुख्याध्यापक, काही संस्थाचालक यांना नवीन भरती चे चॉकलेट देतात.पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती करण्यासाठी संचमान्यतेमध्ये रिक्त पदे असणे गरजेचे आहे.ही रिक्त पदे संचमान्यतेत नसल्यास पुणे येथून नवीन रिक्त पदे असलेली संचमान्यता करून घेण्यासह घरपोच आणून देण्याचीही शिक्षण विभागातील सर्व प्रकारची गैरप्रकारातील कामे व्हाईट करून आणण्यात सराईत असलेल्या बासरीवाला सांभाळतो.नंतर संबंधित शाळेत नवीन शिक्षची रिक्त पदे सुद्धा भ्रष्ट अधिकारी आणि बासरीवाला मध्यस्थ त्यांच्या संपर्कातील व्यक्तीची निवड करून पदमान्यता देणेपर्यंत सर्व जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढाकार घेतात.या सर्व चक्रव्युहातून भ्रष्टांसह, दलाल व संस्थानिक, मुख्याध्यापक लाखोची उलाढाल करून मालामाल होत असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.या सर्व गैरप्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी एसआयटीकडे विरोधी गटाने केलेली आहे.एसआयटीच्या चौकशीत त्या गटाने गैरकारभाराचे सर्व पुरावेसुद्धा जोडलेले आहेत.आता शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी, राज्यकर्ते भ्रष्टांच्या विरोधात कोणती कारवाई करतात ? याकडे जाणकार मंडळीचे लक्ष लागले आहे.




### घोटाळा पुन्हा पुन्हा , दाखल होणार गुन्हा...

शालेय शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात दाखल गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला आता राज्यभरातील गुन्ह्यांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. नागपूर शहरातील पोलिस उपायुक्त नित्यानंद झा हे या एसआयटीचे प्रमुख आहेत. शालार्थ घोटाळ्यात जिथे जिथे राज्यात गुन्हे दाखल झालेले आहेत तिथे तिथे चौकशी करण्याचे काम आता ही एसआयटी करेल. विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोज शर्मा यांनी अलिकडेच या संबंधीचा आदेश काढला आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी चाळीसगाव (जि. जळगाव) येथे तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिस त्याची चौकशी करत आहेत. मात्र, नागपुरातील घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी तेथील पोलिस आयुक्तांनी नित्यानंद झा यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमलेली होती. शालार्थ घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर अशा सगळ्या गुन्ह्यांचा एकत्रितपणे आणि अधिक सुलभपणे तपास व्हावा यासाठी नित्यानंद झा प्रमुख असलेल्या एसआयटीला राज्यभरातील गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार या एसआयटीमध्ये आणखी काही अधिकाऱ्यांचा समावेश करण्याचा अधिकार या एसआयटीला असेल.

# पेट्रोल पंपावर अफवेमुळे रांगा... गोंधळ वाढताच पंप बंद !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मेहकर–मालेगाव या राष्ट्रीय महामार्गावर येत असलेल्या ग्राम पिंपरी सरहद्द येथील जय हो बळीराजा पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल बंद असल्याच्या अफवेमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला आहे.





अफवा पसरताच पंपावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परिसरातील तसेच बाहेरील वाहनचालक मोठ्या संख्येने इंधन भरण्यासाठी दाखल झाल्याने गर्दी प्रचंड वाढली. या दरम्यान काही वाहनचालकांमध्ये पुढे जाण्याच्या घाईतून लोटा-फाटा व भांगडी झाल्याने वातावरण तणावपूर्ण बनले. या गोंधळात पंप कर्मचाऱ्यांना पंप बंद करून कॅबिनमध्ये थांबण्याची वेळ आली. काही जणांनी अतिरिक्त कॅन व वाहनांसह इंधन घेण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती आणखी चिघळली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ लागल्याने पोलिसांना बोलवण्याची वेळ आली असून, पोलीस येईपर्यंत पेट्रोल व डिझेल वितरण बंद ठेवण्यात आले आहे. दरम्यान, लग्नसराई, मृत्यू प्रसंग तसेच इतर तातडीच्या कामांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे.

रिसोड शहरात गेल्या तीन दिवसां पासून पेट्रोल व डिझेलच्या तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले आहे. शहरातील महानंद, सोसायटी, जाधव, खंडारे चारही पेट्रोल पंपांवर पेट्रोल किंवा डिझेल उपलब्ध नसल्याने वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही पंपांवर डिझेल उपलब्ध असताना पेट्रोलचा तुटवडा आहे, तर काही ठिकाणी पेट्रोल असून डिझेल मिळत नसल्याचे चित्र आहे.

दरम्यान, लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या अफवांमुळे नागरिका 'मध्ये घबराट पसरली असून अनेक वाहन धारक मोठ्या प्रमाणात इंधन साठवण्याकडे वळले आहेत. परिणामी, पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून काही ठिकाणी एक ते दोन तास प्रतीक्षा केल्यानंतरही इंधन मिळणे कठीण होत आहे.

### जिल्ह्यातील ६ शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, पुण्यात होणार गौरव

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील सहा शिक्षकांना 'देह एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र' यांच्याकडुन २०२५-२०२६ वर्षाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २९ मार्च रोजी ग. दि. माडगूळकर सभागृह निगडी, पुणे येथे शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जाणार आहेत.

पुरस्कार प्राप्त शिक्षकांमध्ये जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रीय शाळा कळंबा महाली येथील संदीप सुधाकरराव पाठक, जि. प. शाळा काटा क्रमांक २ येथील नंदा किसन खंदारे-गायकवाड, जि. प. प्राथमीक शाळा कोळगाव येथील सुशीलकुमार विजयकुमार मालवी, जि. प. वरिष्ठ प्राथमिक शाळा कळमगव्हाण येथील विनोद मधुकर शेजुळ, जि. प. हायस्कूल उंबरठा बाजार येथील विजयकुमार किसन मापारी, जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, विठोली येथील अर्जुन अंकुशराव लोंढे आणि जि. प. वरिष्ठ प्राथमिक शाळा कोठारी येथील अर्चना सोपान सरकटे यांचा समावेश आहे. या शिक्षकांनी तळागाळातल्या विध्यार्थ्यांना घडवण्यासाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून केलेले अध्यापन, नाविन्यपूर्ण उपक्रम, स्पर्धा परीक्षेची तयारी , प्रयोगातून शिक्षण अशा विविध कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. या पुरस्कारामुळे या शिक्षकांच्या कार्याचा गौरव होणार असून इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळणार आहे. पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे जिल्हाभरातून अभिनंदन केले जात आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com














रामनवमी शोभायात्रेचे गांधी रोडवर उत्सव संकुल समोर आरआरसी नेटवर्क कडून जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच खिचडी वाटप करण्यात आले होते. अकोलेकरांनी मोठ्या प्रमाणात खिचडीचा आस्वाद घेतला. आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख चि. आर्यन सह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शोभायात्रेत जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, माजी आमदार बबनराव चौधरी, शोभायात्रा समितीचे अध्यक्ष अरुण शर्मा, प्रा. अनुप शर्मा, रमेश बाहेती, नगरसेवक सुनील इन्नाणी, कृष्णा शर्मा, शिवप्रकाश रुहाटीया, रामप्रकाश मिश्रा, राहूल राठी, भाजप जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी, गिरीराज तिवारी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शोभायात्रेच्या मार्गावर विविध संस्था, संघटनांकडून शितपेयाचे वाटप करण्यात आले. शोभायात्रेत राम भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. शोभायात्रेत मंगलवाद्यांचा गजर आणि देखाव्यांनी शहरवासियांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. जय श्रीरामचा जयघोष होत होता. अकोला शहरातील श्रीराम नवमी शोभायात्रेचे स्वरुप वाढत असलेले दिसत आहे. शहराच्या विविध भागातील नागरीक शोभायात्रा पाहण्यासाठी आले होते. शोभायात्रा मार्गावर मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसत होती. रात्री ९.३० वाजताच्या सुमारास शोभायात्रेची सांगता झाली. कुठेही अनुचित प्रकार होवू नये म्हणून पोलिस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक आणि वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून होते.

# शिक्षक भरतीच्या निवड याद्या नव्याने जाहीर करण्याचे आदेश ; सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोला :** राज्यातील २०२२ मधील शिक्षक भरती प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत सर्व निवड याद्या नव्याने जाहीर करण्याचे आदेश शिक्षण विभागाला दिले आहेत. या निर्णयामुळे गुणवंत मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या (सर्वसाधारण) प्रवर्गातून नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) ५५ टक्के गुण मिळवून पात्र ठरलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर संधी नाकारण्यात आली होती. तत्कालीन शिक्षण आयुक्तांनी जाहीर केलेल्या निवड यादीत या उमेदवारांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात समाविष्ट न केल्याने अनेक उमेदवारांवर अन्याय झाल्याची तक्रार होती. याविरोधात नेहा सुमित बोकाडे तसेच राज्यातील सुमारे २०० याचिकाकर्त्यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले.



सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने जितेंद्र कुमार विरुद्ध राज्य शासन आणि विकास संखाला विरुद्ध राज्य शासन या प्रकरणांचा आधार घेतला. या निर्णयांमध्ये आरक्षित प्रवर्गातील उमेदवार गुणवत्तेनुसार पुढे असतील, तर त्यांना सर्वसाधारण प्रवर्गातील जागांवर संधी देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच, न्यायालयाने प्रदीप कुमार विरुद्ध राज्य शासन या प्रकरणातील निर्णय ग्राह्य धरला नाही. भरती प्रक्रियेच्या अवघ्या दोन दिवस आधी राज्य सरकारने केलेला नियम बदल अन्यायकारक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. या अचानक बदलामुळे अनेक पात्र उमेदवार वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, २०२२ मधील शिक्षक भरतीच्या सर्व निवड याद्या नव्याने तयार कराव्यात, उमेदवारांचे गुणवत्तेच्या आधारे पुनर्मूल्यांकन करावे, पात्र मागासवर्गीय उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील जागांवर समाविष्ट करावे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो उमेदवारांना दिलासा मिळाला असून अनेकांना नव्याने नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि समानतेच्या तत्त्वांना बळकटी देणारा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया याचिकाकर्ते नेहा सुमित बोकाडे, विजय सानप, विठ्ठल सरगर, योगेश अहिरे, सुनील कांदे आणि मनीषा ह्याळीज यांनी व्यक्त केली आहे.

# अकोल्याच्या चोरांचा अमरावती जिल्ह्यात प्रताप

## ४४ हजारांच्या बकऱ्या आणि बोकडांची चोरी

प्रतिनिधी २७ मार्च



**अकोला :** अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवगाजी प्लॉट येथे राहणाऱ्या तन्वीर खान जमील खान यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली की, दिवसाढवळ्या अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या शेजारच्या चार बकऱ्या आणि तीन बोकड चोरून नेले. चोरी झालेल्या बकऱ्यांची किंमत ४४ हजार रुपये आहे. अंजनगाव सुर्जी पोलिसांनी त्वरित चक्रे फिरवीत अकोला शहरातून तीन बकरी चोरांना अटक केली. ग्रामीण पोलीस गुन्हे शाखेचे पीएसआय मूलचंद भांबुरकर आणि त्यांचे पथक या प्रकरणाचा तपास करत होते. त्यांना माहिती मिळाली की अंजनगाव सुर्जी येथून ज्या बकऱ्या चोरी गेले आहेत त्यांची चोरी अकोला शहरातील चोरट्यांनी केली आहे. अकोल्याचा रहिवासी असलेल्या शेख नबाब शेख आणि त्याच्या दोन साथीदारांनी चार चाकी वाहनातून या बकऱ्या चोरून नेल्या होत्या. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अकोल्यातील वाशिम बायपास वरील हुसैनि सुपर शॉप जवळून तीनही चोरट्यांना अटक केली. या चोरट्यांमध्ये हमजा प्लॉट निवासी शेख नवाब शेख आशिक, अंबिका नगर निवासी शेख रिजवान शेख गुलाब, आणि नबाबपूरा निवासी शेख समीर शेख लाला यांचा समावेश आहे. चौकशी दरम्यान या तिघांनी २७ फेब्रुवारी रोजी अंजनगाव सुर्जी येथून सात आणि २३ मार्च रोजी दोन अशा एकूण नऊ बकऱ्या चोरल्याची कबुली दिली.

# आर्मी जवानावर मित्रांकडून जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी २७ मार्च

## ♦ तीन आरोपी अटकेत, न्यायालयात हजर करून पुढील कारवाई

**अकोला :** जुने शहर पोलिस स्टेशन अंतर्गत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आर्मीमध्ये कार्यरत असलेल्या युवकावर त्याच्याच मित्रांकडून जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली असून या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. जुने शहर पोलीस ठाण्यात दिलीप दयाराम तेलगोटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्यांचा मुलगा आर्मीमध्ये कार्यरत आहे. तो सुट्टीवर घरी आला असताना काल रात्री आपल्या मित्रांसोबत बाहेर गेला होता.

दरम्यान, त्याच मित्रांनी त्याच्यावरच जीवघेणा हल्ला करून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणातील



आरोपी म्हणून यशवंत उर्फ गोलू गणेश ठाकूर (वय २७), जय विनोद मोरेकर आणि बाळा धुमाजी सोलापुरे,सर्व रा. अकोली यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सध्या तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# अकोल्यात डॉ. लाल पाथलॅब्सच्या अत्याधुनिक प्रयोगशाळेचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी २७ मार्च

## ♦ होम सॅम्पल कलेक्शन द्वारे घरबसल्या सुरक्षितपणे चाचण्या होतील

**अकोला** :विश्वासार्हता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम आता अकोलेकरांच्या आरोग्यासाठी सज्ज झाला आहे. देशातील नामांकित 'डॉ. लाल पाथलॅब्स'ची नवी अत्याधुनिक प्रयोगशाळा. पोलीस अधीक्षक आर्चित चांडक यांच्या हस्ते या सुविधेचे भव्य लोकार्पण करण्यात आले.



निदान अचूक तर उपचार योग्य, हेच सूत्र जपणाऱ्या डॉ. लाल पाथलॅब्सने आता अकोल्यात आपले पाऊल टाकले आहे. ७५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आणि कोट्यवधी रुग्णांचा विश्वास असलेली ही लॅब आता अकोलेकरांच्या सेवेसाठी सज्ज झाली आहे. या नवीन प्रयोगशाळेचे उद्घाटन अकोल्याचे पोलीस अधीक्षक आर्चित चांडक यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी डॉ. लाल पाथलॅब्सचे एव्हीपी पुनीत शर्मा आणि डॉ. मंगेश चिकाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत अकोल्याच्या आरोग्य सेवेत एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

येथे रुटीन तपासण्यांपासून ते अत्यंत क्लिष्ट अशा स्पेशालिटी चाचण्या एकाच छताखाली उपलब्ध आहेत. अनुभवी पॅथॉलॉजिस्टच्या देखरेखीखाली प्रत्येक नमुन्याची बारकाईने तपासणी केली जाणार आहे. आजार वाढण्यापूर्वीच त्याचे निदान व्हावे, यासाठी विशेष हेल्थ पॅकेजेसची सुविधा येथे देण्यात आली आहे. अकोलेकरांना आता लॅबमध्ये जाण्याची गरज नाही; 'होम सॅम्पल कलेक्शन'द्वारे घरबसल्या सुरक्षितपणे चाचण्या करून घेता येतील. या उपक्रमामुळे केवळ अकोला शहरच नव्हे, तर लगतच्या ग्रामीण भागातील रुग्णांनाही वेळेवर आणि दर्जेदार निदान मिळणे सोपे होणार आहे. पुनीत शर्मा आणि डॉ. मंगेश चिकाले यांनी या सुविधेच्या माध्यमातून अकोल्यातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

# बार्शीटाकळीच्या सर्वज्ञ ऑटोमोबाईल्सचा धमाका

प्रतिनिधी २७ मार्च

## ♦ स्वस्त सर्व्हिस आणि मोठ्या सवलतींचा पाऊस

**बार्शीटाकळी:** तुमच्या लाडक्या दुचाकीची काळजी आता अगदी खिशाला परवडणाऱ्या दरात होणार आहे. बार्शीटाकाळी येथील 'सर्वज्ञ ऑटोमोबाईल्स' घेऊन आले आहेत भव्य 'मेगा सर्व्हिस आणि एक्स्चेंज कार्निव्हल'. सवलतींचा असा धमाका जो तुम्ही कधीच पाहिला नसेल.

जर तुमच्याकडे 'हिरो'ची गाडी असेल, तर आता तिची देखभाल करण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे. २६ मार्च ते २९ मार्च २०२६ या कालावधीत बार्शीटाकाळी येथील सर्वज्ञ ऑटोमोबाईल्समध्ये एका विशेष कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. या चार दिवसांच्या मेळाव्यात ग्राहकांना भरघोस सवलती मिळणार आहेत. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे एच एफ डिलिक्स किंवा एक्सट्रिम १२५ या





गाड्या आहेत, त्यांना कंपनीचे नवीन 'व्हर्जन अपडेट' पूर्णपणे मोफत करून दिले जाणार आहे. पेड सर्व्हिस लेबर चार्जेस फक्त ९९ रुपये. प्रत्येक गाडीचे वॉशिंग आणि नायट्रोजन एअर मोफत.पेंट प्रोटेक्शनवर ३५ टक्के सूट, तर स्पेअर्स आणि ऑईलवर ५ टक्के सवलत देण्यात येईल. पॅशन प्लसवर २५०० रुपये आणि सुपर स्प्लेंडरवर ३००० रुपयांपर्यंतची थेट सूट देण्यात येईल. जुनी गाडी देऊन नवीन गाडी घेतल्यास तब्बल ५००० रुपयांपर्यंतचा बोनस मिळेल. या उपक्रमासाठी हिरो कंपनीचे टेरिटरी सर्व्हिस मॅनेजर लक्ष्मी मॅडम आणि अमन यादव स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन करत आहेत. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी रियाज अली, सौ.



शालिनी वाहूरवाघ, अहमद शाह, मोसीन खान, सै. जावेद, सुनील घुगे, रेहान, दिनेश वऱ्हाडे आणि सचिन राजूरकर ही टीम अहोरात्र परिश्रम घेत आहे. हा कार्निव्हल सकाळी १०.०० ते संध्याकाळी ७.३० या वेळेत सुरू राहणार आहे. तरी बार्शीटाकाळी आणि परिसरातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी 'सर्वज्ञ ऑटोमोबाईल्स' येथे त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्राहकांनी या क्रमांकावर संपर्क साधावा.....०७२५५-२९९००५, ४२२३४७०४१, ७७७४९९०१११, ८६६८८३१९४४, ९७६४४०८५८८

# खापरवाडी बायोचार निर्मिती प्रकल्प ठरला शेतकऱ्यांसाठी वरदान..!

प्रतिनिधी २७ मार्च

**अकोट** : बायो चार उत्पादन प्रकल्प अंतर्गत अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना सुवर्णसंधी खारपण पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागातील शेतकऱ्यांनाच वेगवेगळ्या प्रकारचे फायदे होणार आहेत यात विविध कीड व रोगांचे उर्वरित अवशेष या प्रयोगामुळे नष्ट केल्या जाते व यासाठी शेतकऱ्यांनी अतिरिक्त कोणताही खर्च करायचं काम नाही याउलट बायो चार चा शेतात वापर केल्याने जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो व त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते थोडक्यात शेताची जिवाणू व जमिनीतील हवा खेळती राहते आणखी यापासून बरेच फायदे आहेत अशा या नवीन पुण्य प्रकल्पाची सुरुवात खापरवाडी

## ♦ बायो चार प्रकल्प एक मात्र फायदे अनेक...



येथील प्रगतिशील प्रयोगशील पुरस्कार प्राप्त शेतकरी जगन बगाडे यांच्या प्रयोगशील प्रयत्नातून राबवण्यात येत आहे यात सिजेंटा फाउंडेशन इंडियाचे प्रकल्प समन्वयक भूषण कोसुरकर अकोला, धीरज राठोड प्रकल्प अधिकारी आकोट तसेच एस डी ओ आकोट तुषार ढंगारे, अकोट तालुका कृषी अधिकारी अजित वसेकर, गणेश निगोळे मंडळ अधिकारी आकोट, विजय ओळंबे, राम कोळंबे, विलास ओइंबे, अरुण हिंगणकर, विनोद हिंगणकर, संजय डिवरे, प्रल्हाद बगाडे ,पांडुरंग भोपळे ,योगेश कोळंबे, जीवन भोपळे या भागातील प्रयोगशील प्रगतिशील शेतकरी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पराटी जाळण्याने नुकसान

- जमिनीतील सूक्ष्म जीवाची हानी, कार्बन विसर्जनात वाढ, मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी, वातावरण पूरक शेतीस बाधा.

### बायोचार वापराचे फायदे

- जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवते, जमीन भुसभुशीत करते, पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, जमिनीचा पोत सुधारण्यास मदत, रासायनिक खताचा वापर कमी करते, उत्पादन क्षमता वाढवते.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK